


आत्मसाक्षात्कार होतानाच तुम्हाला
मी शिखरावर पोचवते पण तुम्हीच घसरायला लागता
म्हणून शिखरावर खंबीरपणे टिकून राहण्याचा प्रयत्न तुम्हीच केला पाहिजे.

**प. पू. श्रीमाताजी निर्मलादेवी**

# चैतन्य लहरी

अंक क्र. ५ व ६ मे-जून २००१

# वाढदिवस समारंभ दिल्ली, १९-२०-२१ मार्च २००१











# अनुक्रमणिका


| तपशील | | पान क्र. |
|---|---|---|
| १ | 'देता किती घेशिल दो करांनी' | २ |
| २ | वाढदिवस समारंभ<br>प. पू. श्री माताजींचे भाषण<br>दिल्ली २० मार्च २००१ | ३ |
| ३ | सर. सी. पी श्रीवास्तव साहेबांनी लिहिलेल्या<br>पुस्तक प्रकाशन समारंभाप्रसंगी<br>प. पू. श्रीमाताजी निर्मलादेवींचे भाषण | ५ |
| ४ | सर सी. पी. श्रीवास्तव साहेब यांचे भाषण | ६ |
| ५ | वाढदिवस पूजा<br>प. पू. श्री माताजींचे भाषण<br>दिल्ली २१ मार्च २००१ | ७ |
| ६ | वाढदिवस सोहळा वृत्तांत | ११ |
| ७ | दिल्ली पब्लिक प्रोग्राम<br>प. पू. श्री माताजींचे भाषण<br>दिल्ली २६ मार्च २००१ | १२ |
| ८ | दहा गुरुंची अवतरणे (मोझेस) | १५ |
| ९ | अमृतवाणी | १६ |
| १० | सहस्रार पूजा<br>प. पू. श्री माताजींचे भाषण | १८ |
| ११ | हंस चक्रा बाबत (संक्षिप्त) | २१ |
| १२ | सहज-समाचार | २२ |

# "..... देता किती घेशिल दो करांनी"

प. पू. श्रीमाताजींच्या स्वरूपात श्री आदिशक्तीचे पृथ्वीतलावरील अवतरण या गेल्या सहस्रकातील अभूतपूर्व घटनेची पार्श्वभूमी व महत्त्व सर्व सहजयोगी जाणतात. या घटनेला एक वैश्विक महत्त्व आहे हे विशद करण्याची म्हणूनच आवश्यकता नाही. आवश्यकता असेल तर सहजयोग्यांनी आपण श्रीमाताजींचे किती व कशासाठी ऋणी आहोत याचे सखोल अवलोकन करण्याची व त्याची जाणीव व्यापक करण्याची आहे.

प. पू. श्रीमाताजींनी अलिकडच्या अनेक प्रवचनांमधून त्यांच्या अपेक्षा वेगवेगळ्या संदर्भात परखडपणे व्यक्त केल्या आहेत. श्रीमाताजींची प्रेमशक्ति व करूणाशक्ति अमर्याद आहे. तशीच त्यांची ध्येयदृष्टिही अमर्याद आहे. आपण सहजयोगी त्यांच्या कार्याची उपकरणे आहोत. अर्थात ही उपकरणे अत्यंत कार्यक्षम असणे हे ओघानेच आले तरी ती आपणा प्रत्येकाची वैयक्तिक जबाबदारी आहे. आपण कोणत्याही बाबतीत कमी असलो तर सामूहिकताही त्या अनुषंगाने कमकुवत बनणार याचे भान म्हणूनच आपण सदैव बाळगले पाहिजे.

श्रीमाताजींनी आपणा सर्वांना सर्व काही दिले. आपले सर्व प्रश्न सोडवले, सर्व चिंता दूर केल्या, सर्व संकटांचे निराकरण केले. आता पाळी आपली आहे. आपण काय मागू शकतो असा विचार केला व त्याचाच मागोवा घेत राहिलो तर या प्रश्नाचे उत्तर श्रीमाताजींच्या खालील शब्दात सापडेल.

**"I will go on giving people**
**What they want**
**Until they begin to want**
**What I want to give them."**

"मी लोकांना जे जे हवे असते ते देत असते कारण एक ना एक दिवस मला त्यांना जे काही द्यायचे आहे ते मागण्याची त्यांना इच्छा होईल."

असे मागणे आपण मागितले तर "देता किती घेशिल दो करांनी" अशीच आपली अवस्था होईल.

# वाढदिवस समारंभ

## प. पू. श्री माताजी निर्मला देवी यांचे भाषण

(सारांश)

दिल्ली २० मार्च २००१

सत्याच्या शोधात असलेल्या व सत्य समजेल्या सर्व साधकांना प्रणाम!

**मनुष्यजातीचा सर्वात मुख्य प्रश्न म्हणजे माणसाने अजून स्वतःलाच ओळखलेले नाही.** त्यामुळे आपण किती उच्च स्थितीला येऊ शकतो, त्यांना कल्पना नाही. याचे कारण म्हणजे माणसाचे अज्ञान. तुम्ही जर तुमच्या हृदयात डोकावून पाहिले आणि अध्यात्मिक जीवनाचा थोडासा जरी विचार केला तरी तुम्हाला समजेल की, तुमच्या आतमध्येच प्रेम, शांती आणि सूज्ञता यांचे ऐश्वर्य आहे. माणसाला आपले खरे स्वरूपच काय आहे हे कळत नाही. सहजयोगी लोकसुद्धा कधी कधी नम्र असूनही त्यांना मिळालेल्या शक्तीबद्दल अज्ञानात असतात. त्यामुळे लोकांना सहजयोग सांगायला ते कचरतात. काही सहजयोग्यांना वाटते सहजयोग सांगितल्यामुळे अहंकार वाढेल. पण खरे म्हणजे समाजामध्ये लोकांना निर्भिडपणे सहजयोग सांगण्याने अहंकार येण्याची शक्यताच नाही. उलट आपण स्वतः इतर लोकांपेक्षा विशेष आहोत आणि त्यांच्यामध्ये परिवर्तन होणे आवश्यक आहे असा विचार केल्याने अहंकार बळावतो. लक्षात घेण्याची गोष्ट म्हणजे तुम्ही सहजयोगी असाल आणि नियमित ध्यान करत असाल तर तुमच्यामधील शक्ती आपोआपच कशी प्रकट होऊ शकते याचे तुमचे तुम्हालाच आश्चर्य वाटेल.

कुंडलीनीच्या जागरणानंतर तुमच्यामधील षड्रिपूंचे सर्व दोष आपोआप गळून जातात. तसेच काही सहजयोग्यांना वाटते सहजयोग सांगितल्यामुळे आपले महत्त्व वाढेल. पण या सर्व बाह्यातल्या गोष्टी आहेत. **तुम्हाला मिळालेल्या आत्मप्रकाशाचे तेज बाहेर दिसून येणे ही गोष्ट महत्त्वाची आहे.** तुम्हा सर्वांना सहजयोग चांगला समजला आहे, तुम्हाला सर्व चक्रांची माहिती आहे पण इतके असूनहि तुम्ही आत्म्याला किती जाणले आहे, तुम्हाला कोणती शक्ति मिळाली आहे, तुम्ही काय करू शकता या गोष्टी तुम्ही लक्षात घेत नाहीत. तुम्हाला आत्मसाक्षात्कार मिळाला तरीही मला सत्य समजले आहे हा आत्मविश्वास तुमच्यामधे नाही. म्हणून लोकांना त्यांच्यामधील अज्ञानाचा अंधार दूर करण्यासाठी हे सत्य तुम्ही सांगितलेच पाहिजे.

मला असे दिसते की, सहजयोगात आल्यावर हल्ली लोकांच्या डोक्यात भलत्याच कल्पना येऊ लागतात. पण तुम्हाला तुमचे खरे स्वरूप समजल्यावर, तुम्हाला मिळालेल्या शक्तीची पूर्ण जाणीव झाल्यावर तुम्हाला समजेल की, नवीन लोकांना जागृती देऊन त्यांनाहि त्यांच्यामधील सुप्त शक्तीची अनुभूती तुमच्याकडून मिळते, हे समजून घेतले तर तुम्ही सहजयोगात जोमाने प्रगति करू शकाल आणि सहजयोगाचा प्रचारही करू शकाल. मग सहजयोग सांगितल्यामुळे अहंकार वाढेल अशी शंका तुम्हाला येणार नाही. म्हणून स्वतःचा आत्मसन्मान बाळगला पाहिजे आणि आपण कोण आहोत याचे भान राखले पाहिजे. मग लीडर बनणे किंवा प्रसिद्धी मिळवणे असले फालतू विचार तुमच्या डोक्यात येणार नाहीत. सगळ्यात मुख्य गोष्ट म्हणजे की, तुमच्यामधील सद्गुण आपोआप वृद्धिंगत होऊ लागतात. तुम्ही इतरांनाही त्याप्रमाणे मार्गावर आणू शकता आणि हे सर्व पैशाचा विचार न करता किंवा कोणालाही न दुखवता तुम्ही करू शकता. इतके असूनही सहजयोगातही लोक पैशाच्या किंवा अधिकाराच्या मागे लागलेले आढळतात आणि आपली खरी शक्ती आतमध्ये आहे, हे विसरतात. तुम्ही तुमच्या आत्म्याला जाणले आहे हेच मोठे परिवर्तन झाले आहे. म्हणून हे ज्ञान स्वतःपुरते न ठेवता इतर लोकांनाही तुम्ही ते वाटले पाहिजे, यासाठी तुम्ही लोकांना आत्मविश्वासाने सहजयोग सांगितला पाहिजे.

जगामध्ये अब्जावधी लोक आहेत पण तुम्ही लोकच सहजयोगात कसे आलात? मी तुम्हाला निवडलेले नाही उलट तुम्हीच मला स्वीकारले आहे. याचाच अर्थ तुमच्यामध्ये असलेली सुप्तशक्ती जाणण्याची संवेदनशीलता तुमच्यामध्ये होती. **एकदा तुम्ही स्वतःच स्वतःला जाणून घेतले की, तुमच्यामधील अहंकार आपोआपच कमी होऊ लागतो.** पैसा किंवा अधिकार मिळवण्याच्या मागे लागल्यामुळेच अहंकार बळावण्याची शक्यता असते. तुम्ही तसे नसाल तर उगीच

स्वस्थ बसू नका आणि तुम्ही काय करू शकता याचे भान ठेवा. हा आत्मसन्मान जो जपतो तो कधीच चुकीच्या गोष्टीकडे वळत नाही, उद्धट भाषा वापरत नाही, त्याला राग येत नाही; उलट त्याच्यामध्ये प्रेम-शक्ती सागरासारखी प्रवाही होते. हाच खरा सहजयोग आहे.

सध्या कलियुग चालले आहे, हे मान्य करूनही तुम्हा लोकांना सहजयोग मिळाला आणि म्हणून तुम्ही इथे आलात. म्हणूनच तुम्ही इतर लोकानाही तो प्रकाश मिळवून दिला पाहिजे म्हणजे त्यांच्यात परिवर्तन घडून येईल. पण जोपर्यंत तुमच्या स्वतःमध्ये हे करण्याची शक्ति आहे हा आत्मविश्वास ठामपणे तुमच्यामध्ये येत नाही तोपर्यंत हे शक्य होणार नाही. तुम्हाला मिळालेली ही अपूर्व संधी आहे. माझे वय झाले असले तरीसुद्धा मी माझे प्रयत्न करीत राहणारच. जोपर्यंत तुमच्यामध्ये संपूर्ण परिवर्तन घडून तुमचा आत्मविश्वास दृढ होत नाही तोपर्यंत काहीही कष्ट करण्याची माझी तयारी आहे. सहजयोगातही काही उथळ प्रवृत्तीचे लोक आहेत आणि ते चुकीच्या गोष्टी करत राहतात. एका तऱ्हेने ते सहजयोगीच नव्हेत. **जोपर्यंत तुम्ही पूर्णपणे गहनतेत उतरत नाही तोपर्यंत तुम्हाला तुमचे खरे आत्मस्वरूप पूर्णपणे कळणार नाही आणि तुमच्या कार्यामध्ये 'सहजपणा' येणार नाही.**

सहजयोगात आल्यावर तुमचे परमचैतन्याबरोबर संधान जुळले आहे. आईनस्टाईननेसुद्धा Torsion area असे त्याला म्हटले आहे. ही शक्ति सदैव तुमच्या पाठीशी असते, तुमचा सांभाळ करते, तुम्हाला मदत करते. इतके असूनही तुम्हाला तुमच्या अंतर्शक्तीची कल्पना नाही. मुंबईमधील कोळी यांची गोष्ट तुम्हाला मी बऱ्याचवेळा सांगितली आहे. त्याचे तात्पर्य हेच आहे की, तुम्ही जेव्हा परमेश्वरी कार्य करत असता तेव्हा निसर्गही तुम्हाला पूर्णपणे मदत करतो.

सबंध मानवजातीमध्ये परिवर्तन घडविण्याची माझी इच्छा असली तरी मी एकट्याने ते काम करू शकणार नाही. **तुम्हाला मी शक्ति दिली आहे आणि त्या शक्तीचे वाहक म्हणून तुम्हीच मला मदत केली पाहिजे. तुमच्यामधून ही शक्ति प्रवाहीत होऊ शकते हेच तुमचे वैशिष्ट्य आहे.** म्हणून तुम्ही सदैव परमचैतन्याच्या संपर्कात असणे फार महत्त्वाचे आहे. तुमच्यामध्ये जसे परिवर्तन घडून आले तसेच परिवर्तन इतरांमध्ये घडविण्याचे आणि दैवी सद्गुण त्यांच्यामध्ये उतरविणे हेच तुमचे काम आहे आणि तुम्हाला हे अशक्य अजिबात नाही कारण तुमच्यामध्ये ती शक्ति आहे. मीसुद्धा संसार व कौटुंबिक जबाबदारी सांभाळून इतके कार्य करू शकले कारण मी स्वतःला पूर्णपणे जाणले आहे हा आत्मविश्वास माझ्यामध्ये होता. तुम्हीही कार्यक्षम होऊन खूप कार्य करू शकाल आणि तुमच्या कार्यामध्ये महत्त्वाकांक्षा, लोभ, क्रोध, मोह इत्यादि अपप्रवृत्ति येणार नाहीत.

माझी मुख्य तळमळ हीच आहे की, तुम्हाला तुमच्या देशबांधवांबद्दल आणि मानव समाजाबद्दल कळकळ असली पाहिजे. तुमची कुंडलीनी आता अशा स्थितीला आली आहे की, तुम्ही खूप काही करू शकाल. तुमच्यापैकी बऱ्याच सहजयोग्यानी खूप कार्य केले आहे हे मी जाणते. पण तुम्ही प्रत्येकाने तसेच कार्य केले पाहिजे. माझे वय ७९ झाले आहे तरी अंतर्यामी मी आहे तशीच आहे; म्हणूनच मी तुम्हाला सदोदित स्वतःला खऱ्या अर्थाने जाणण्याविषयी आणि स्वतःची शक्ति ओळखण्याविषयी सांगत असते. मग तुम्ही श्रीमंत आहात का अशिक्षित हा प्रश्न उरत नाही. **आपण कोण आहोत हे जाणणे यालाच सर्व महत्त्व आहे.** म्हणून तुम्ही सर्वकाळ स्वतःकडे पहात चला; स्वतःच्या अहंकाराकडे पहात चला; असे केल्याने तुमच्यामध्ये साक्षी भाव रुजेल.

लाऊत्से★ यानेही 'Tao' हा शब्द वापरला त्याचा अर्थही स्वतःला जाणणारा असा आहे; फक्त ते कसे प्राप्त करायचे हे त्याने सांगितले नाही. पण अनेक गोष्टी आणि कवितांमधून त्याचे खूप वर्णन केले आहे आणि "Tao" झालेल्या (साक्षात्कारी) लोकांचे वर्णन केले आहे. झऱ्याचा सागर होतो अशी उपमा त्याने दिली आहे. समुद्र नेहमी पृथ्वीच्या अगदी खालच्या सपाटीला असतो. सूर्यामुळे त्याच्यामधील पाण्याची वाफ होते, वाफ वर जाऊन ढग होतात आणि पाऊस पडून पुन्हा समुद्रात येते. तसे तुम्ही झालात की सर्व काही घडून येईल. मग दुसरा कुणी काय करतो व कोण आहे याचा तुमच्यावर काही परिणाम होणार नाही. स्वतःच्या आत्म्याला जाणणे याचाच अर्थ अतिउच्च स्तरावर असणे मग सर्व काही तुम्हांला मिळेल. जगातल्या गरीब निराधार लोकांसाठी मला खूप काही करायचे आहे. काही कार्यक्रम सुरूही झाले आहेत. ओरिसामध्ये खूप काही होण्याची गरज आहे. सहजयोग जितका पसरेल तितके जास्त कार्य घडून येईल. त्यासाठीच खऱ्या अर्थाने आपण सहजयोगी आहोत याचे सदैव जागरूक भान ठेवणारे खूप सहजयोगी तयार झाले पाहिजे. मी जे करू शकले ते करण्याची क्षमता तुमच्यामध्ये सुद्धा आहे. हा आत्मविश्वास अहंकार न होता तुमच्यामध्ये दृढ झाला पाहिजे. सागराच्या स्थितीला येण्याचा हाच अर्थ आहे. सर्व प्राणिमात्रावर प्रेम करण्याची व करूणा ठेवण्याची क्षमता आणि वागण्यातले औदार्य तुमच्यामधे असले पाहिजे. माझ्या उदारपणाला सीमा नाही. पण मी जे काही करते त्याच्यामध्ये प्रेम आणि आनंद हाच

भाव असतो. सुंदर फुले पाहिल्यावर जसे प्रसन्न वाटते तशी प्रसन्नता दुसऱ्यासाठी काही करण्यामध्ये मला वाटते. तुमच्यामध्येही आनंद देणाऱ्या, शांति देणाऱ्या सर्व क्षमता आहेत. त्यातूनच तुम्ही सर्व मानवजातीमध्ये परिवर्तन घडवून एक सुंदर जग निर्माण करणार आहात.

खूप ध्यान करत रहा, स्वतःकडे पहा आणि आपण कुठे चुकतो किंवा आपण कुठे कमी पडतो हे जाणून घ्या. तुम्हांला मिळालेली शक्ति ही एक महान शक्ति आहे, त्याच्यामधूनच जीवनामधील असत्य व भ्रामक समजूती दूर होणार आहेत. ही शक्ति वापरण्यासाठी तुम्ही शुद्ध झाले पाहिजे. आज माझ्या वाढदिवशी मला काही भेट द्यावीशी तुम्हांला वाटेल तर मी हेच मागेन–

स्वतःचा आत्मविश्वास बळकट करा, कार्याला लागा. समर्पण, प्रामाणिकपणा आणि नम्रता बाळगली तर यश तुमचेच आहे. एरवी मला कसली इच्छा अशी नसते. पण **माझी सुप्त इच्छा हीच आहे की आपण संपूर्ण मानवजातींमध्ये परिवर्तन घडवून आणले पाहिजे.**

सर्वांना अनंत आशीर्वाद.

●

## सर सी. पी. श्रीवास्तवसाहेबांनी लिहिलेल्या Corruption या पुस्तकाचे प्रकाशन डिसेंबर २०००मध्ये झाले. त्या प्रसंगी प. पू. श्रीमाताजींनी केलेल्या भाषणाचा सारांश

आज आपल्या देशासमोर अनेक प्रश्न आहेत. त्याचे निरसत करण्यासाठी तुमच्यामध्ये देशभक्ति बाणली पाहिजे. तुमचे या मातृभूमीवर जर खरे प्रेम असेल तर तुम्ही अप्रामाणिक असूच शकत नाही. या देशाला फार महान इतिहास आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात देशासाठी सर्वस्व पणाला लावून अनेकांनी बलिदान दिले, असह्य यातना व छळ सहन केला. माझ्या आई-वडिलांनीही देशासाठी सर्वस्वाचा त्याग केला व तुरुंगवास भोगला. त्या सर्वांचे देशप्रेम लक्षात घ्या. ते देशप्रेम तुमच्यामध्ये मुरले की तुम्ही अप्रामाणिकपणा व भ्रष्टाचार या दुर्गणांपासून मुक्त व्हाल. परमेश्वराची तुमच्याकडून हीच अपेक्षा आहे.

तुम्हाला मानसिक शांति मिळवायची असेल तर भ्रष्टाचाराच्या मार्गाकडे कशाला वळाता? भ्रष्टाचारी माणसाला मानसिक शांति मिळाल्याचे माझ्या पाहण्यात नाही. पण आजकाल आपल्याकडे भ्रष्टाचार इतका बोकळला आहे की मला समजत नाही. तीस-पस्तीस वर्षांपूर्वी मी इथे होते तेव्हा हे प्रकार नव्हते, फार तर खालच्या सेवकवर्गासाठी चहा वगैरे द्यायची पद्धत होती. पण आजकालचा भ्रष्टाचार पाहिला की कुणाच्याही मनात गरीब लोकांसाठी कणभरही दया नसावी असेच दिसते. कर्करोगाने शरीर ग्रासावे तसा हा भ्रष्टाचार आपल्या देशभर माजला आहे. एकच उपाय करण्यासारखा म्हणजे मातृभूमीची प्रार्थना करणे, रोज सकाळी तिच्या प्रतिमेची पूजा करणे. या देशात जन्माला येणे ही फार मोठ्या भाग्याची गोष्ट आहे म्हणून तिचे आभार माना आणि तिच्या ऋणाचे सतत स्मरण ठेवा.

माझ्या पतीने याच भ्रष्टाचार या विषयावर हे पुस्तक लिहिले आहे आणि तुम्ही सर्वांनी गंभीरपणे ते वाचावे व त्यावर मनन करावे असे मला वाटते. म्हणूनच मला वाटते की तुम्ही आपल्या मातृभूमीच्या गौरवाला धक्का लागेल असे कसलेही वर्तन न करण्याची शपथ घेतली पाहिजे. हे देशप्रेम पूर्णार्थाने तुमच्या हृदयात प्रगट झाले तरच या भ्रष्टाचाराच्या नरकातून तुमची सुटका होईल.

●●●

## दि. २० मार्च २००१ रोजी संपन्न झालेल्या प. पू. श्रीमाताजींच्या वाढदिवस समारंभात सर सी. पी. श्रीवास्तवसाहेबांनी केलेल्या भाषणाचा संक्षिप्त सारांश

''जगभरातील ऐंशी देशांमधून इथे जमलेल्या सहजयोग्यांनी इथले वातावरण स्वर्गीय बनवले आहे व हा स्वर्ग निर्माण करणारा परमेश्वरही (श्रीआदिशक्ति) साक्षात आपल्यामध्ये आहे हे आपणा सर्वांचे महाभाग्य आहे. एका व्यक्तीने आपले सर्व जीवन संपूर्णपणे परमेश्वरी कार्यासाठी वाहून घेतल्यामुळे हे घडू शकले. १९७० साली त्यांनी मानवजातीच्या परिवर्तनासाठी कार्य करण्याचा आपला मनोदय मला सांगितला. अगदी मोजक्या लोकांना बरोबर घेऊन सुरू केलेला सहजयोग आता बहरला आहे.

त्यावेळची एक गोष्ट मला पुन्हा सांगावीशी वाटते. आम्ही लंडनच्या जवळ रहात असताना माताजींना एक गृहस्थ अंमलीपदार्थ सेवनाच्या आहारी जाऊन रस्त्याच्या कडेला हलाखीच्या अवस्थेत लोळत पडला होता; त्याला माताजींनी घरी आणले व घरात ठेवून ठेऊन त्याची सर्व देखभाल केली. त्याला सहजयोग दिल्यावर दोन महिन्यात तो व्यसन सुटून पूर्ण बरा झाला. ते पाहून मी सनदी अधिकारी असूनही सहजयोग स्वीकरला.

आपल्या भोवतालचे आजचे जग चंगळवाद, स्पर्धा, भांडणे यांनी ग्रस्त आहे. तर तुम्हा लोकांचे जग प्रेम, एकात्मता यांनी भरले आहे. म्हणून मी माताजींच्या चरणी प्रार्थना करतो की, इथल्यासारखे वातावरण जगभर सर्वत्र पसरू दे. म्हणून माझी हीच इच्छा आहे की संपूर्ण जगामध्ये परिवर्तन होईपर्यंत त्यांनी आमच्यामध्ये रहावे. तुम्ही त्याचा ७८वा वाढदिवस साजरा करत असला तरी त्या चिरतरुण आहेत आणि पहिल्याइतक्याच तेजस्वी आहेत.

आजकालची मानव समाजाची स्थिति सगळीकडे फार खालावली आहे, स्वार्थाच्या पोटी माणूस माणसावरच उलटू लागला आहे. सर्व जाती-पाती नष्ट होऊन संपूर्ण मानवजातीला एकत्र बंधुभावामध्ये आणण्यासाठी संतांनी आतापर्यंत खूप कार्य केले, पण मानवजात सुधारली नाही. धार्मिक नेतेही देवाच्या नावाखाली आपापल्या धर्माचे स्तोम वाढवण्यातच व भांडणे करण्यात दंग आहेत व धर्माधर्मात वितुष्ट माजले आहे. आता ही वेळ आली आहे की संकुचित व औपचारिक धर्माच्या पार होऊन प्रत्येकाने अध्यात्मावर उभा असलेला मानवधर्म स्वीकारून आपली उन्नती साधली पाहिजे. प्रत्येक सहजयोग्याची हीच जबाबदारी आहे की प्रत्यके मानवाला जागृत करून या उच्च स्थितीवर आणले पाहिजे. माताजींनी हेच करून दाखवले आहे.

आपण माताजींचा वाढदिवस साजरा करतानाच स्वतःलाही धन्य व भाग्यवान समजू या की आपल्याला सहजयोग मिळाला. मी पुन्हा एकदा प्रार्थना करतो की संपूर्ण मानवजातीमध्ये असेच परिवर्तन होईपर्यंत माताजींनी आपल्या समवेत असावे.

●●●

# वाढदिवस पूजा

## प. पू. श्री माताजी निर्मला देवी यांचे भाषण

## (सारांश)

## दिल्ली २१ मार्च २००१

आज तुम्ही सर्वजणांनी माझा वाढदिवस साजरा करण्यानिमित्त या सुंदर कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. काल मी तुम्हाला आपल्यातील 'स्व'ला जाणण्याचे महत्त्व सांगितले. तुम्ही माझ्यावर जसे प्रेम करता तसेच तुम्ही इतरांवरही प्रेम केले पाहिजे. आत्मपरीक्षण करून तुम्ही दुसऱ्यांवर किती प्रेम करता व त्यांची काळजी घेता हे तुमचे तुम्हालाच सहज समजेल आणि तसे झाले की सहजयोगातील बऱ्याचशा अडचणी दूर होतील. मला असे कळले आहे की आजकाल काही सहजयोग्यांना पैशाची हाव सुटली आहे व सहजयोगातूनही पैसा कमावण्याचा उद्योग ते करत आहेत. मला ते ऐकून कमालीचा धक्का बसला. कारण **सहजयोगातून पैसे मिळवण्याचा विचारही चुकीचा आहे. अशा लोकांचे बिंग बाहेर पडायला मुळीच वेळ लागणार नाही.** त्याचबरोबर सहजयोगामध्ये लीडर वा प्रसिद्धि मिळवण्याच्या मागे कुणी लागत असतील तर तीही चुकीची समजूत आहे. त्यासाठी त्यांनी राजकारण किंवा दुसऱ्या एखाद्या क्षेत्रात जाणे बरे. सहजयोगामधून तुम्हाला तुमच्या स्वतःच्या व इतरांच्या हृदयातील प्रेमसागरात उतरायचे आहे. प्रेमामधूनच जीवन सुंदर व आल्हाददायक बनू शकते. ज्यांच्या जवळ राष्ट्रप्रेमाची जाण आहे ते राष्ट्रद्रोह कधीच करणार नाहीत. कारण स्वातंत्र्य व राष्ट्रहिताशिवाय दुसरा कोणताच विचार त्यांच्या मनात येणार नाही. या राष्ट्रप्रेमापोटीच या भारतामध्ये स्वातंत्र्यासाठी भयानक हालअपेष्टांना सामोरे गेलेले अनेक महान स्वातंत्र्यवीर होऊन गेले. अध्यात्मिक जीवन हेच आता तुमचे कार्यक्षेत्र आहे आणि त्यातच तुमच्या आत्म्याला आनंद मिळणार आहे. कारण त्या स्थितीमध्ये शांतीचे साम्राज्य आहे. त्याबद्दल जर तुमच्याजवळ आपुलकी असेल तर तुमच्या डोक्यात पैसा, सत्ता अशा फालतू कल्पना शिरणार नाहीत. मी तर त्या गोष्टींची कधीच पर्वा केली नाही. अर्थात जीवनामध्ये प्रत्येकाला पैशाची गरज असते पण त्याचाच हव्यास बाळगण्याची जरूरी नाही. इतकी वर्षे मी हेच सांगत आले तरीही काहीजणांची ही सवय सुटत नाही याचे मला नवल वाटते. **त्यांचे हे धंदे उघडकीस यायला वेळ लागणार नाही हे त्यांनी लक्षात घ्यावे. सध्याचा काळ अशा वाममार्गी लोकांना उघडे पाडणारा आहे हेही मी गेल्यावेळी बजावले होते.** तरीही ज्या लोकांना सहजयोगातही हेच धंदे करायचे आहेत त्यांनी सहजयोगामधून बाहेर जावे; ज्यांना स्वतःचेच नुकसान करून घ्यायचे आहे त्यांना सहजयोग थारा देणार नाही.

सहजयोगामध्ये तुम्ही पूर्णपणे समर्पित आणि प्रामाणिक असले पाहिजे. नाही तर तुम्ही सहजयोगातून बाहेर एकदम नरकात फेकले जाल. त्याशिवाय तुमच्यासाठी कुठे जागाच नाही. मला हे चित्र स्पष्टपणे दिसत आहे. काळाचा महिमाच असा असतो की काळानुसार वेगवेगळ्या शक्ति त्या त्या काळी प्रभाव पाडू लागतात. त्याप्रमाणे सध्याचा काळ असत्याचे ढोंग उघडे पाडण्याचा आहे आणि त्यातून तुमची गय केली जाणार नाही; मग तुम्ही लीडर असा वा आणखी कोणी असा. अप्रामाणिकपणा व बेईमानी कराल तर तुमचे बिंग फुटणारच व तुम्हाला शिक्षा पण मिळणार. आजच्या या आनंदाच्या प्रसंगी हे बोलावे लागत आहे याची मला वेदना आहे, पण परिस्थितीच तशी आहे. सहजयोगाने प्रत्यक्ष शिक्षा दिली नाही तरी कोणत्या ना कोणत्या स्वरूपात ही शिक्षा होणारच आहे याची खात्री ठेवा.

आजचा दिवस मंगल आहे म्हणून तुम्ही अ-मंगल असे काही करू नये हे मला सांगावेसे वाटते. काल मी तुमच्याजवळ कोणत्या शक्ति आहेत व त्यांचा तुम्ही दुसऱ्यांसाठी काही चांगले कार्य करण्याकरिता कसा उपयोग करू शकता हे समजावले. त्यातून तुम्हालाच आनंद मिळतो व तो उदारपणा दाखवून कार्य करण्यापासूनच मिळत असतो. पण त्यासाठी तुम्हा स्वतःला काय करायचे आहे यावर ते अवलंबून आहे. पण मला आश्चर्य वाटते की इतका प्रदीर्घ काळ सहजयोग करूनही काहीजणांचा मोह व हव्यास संपला नाही. म्हणून आजच्यासारख्या मंगल दिवशी **सहजयोगाने आपल्याला काय दिले व आपण किती मिळवले, सहजयोगात आपण किती प्रगल्भ झालो, आपल्यात कोणत्या सुधारणा झाल्या याचा विचार केला पाहिजे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे सहजयोगी पूर्णपणे प्रामाणिक असला पाहिजे.** तुम्ही पैसे किंवा अधिकार मिळवण्यासाठी सहजयोगात आला नसून एका नव्या, सुंदर जगामध्ये स्वतःच्या अध्यात्मिक उन्नतीसाठी

आला आहात हे लक्षात घ्या; आणि समस्त मानवजातीलाही ते उपलब्ध करून देण्याचे तुमचे कर्तव्य आहे हेही विसरू नका. तुम्हाला मिळालेला आत्मसन्मान व आत्मप्रतिष्ठा तुम्हीच इतरांनाही मिळवून देणारे आहात. म्हणून आपल्याला जाणवलेल्या आत्म्याचा तुम्हीच मान राखायचा आहे. हे जर तुम्हाला समजले नाही आणि उलट **आलतूफालतू गोष्टींच्या नादी तुम्ही लागलात तर सहजयोगामधून तुम्ही काहीच मिळवले नाही असेच म्हणावे लागेल.** तुमच्यापैकी काहीजण या चुकीच्या व घातक गोष्टीत गुंतले आहेत हे फार क्लेशदायक आहे. तुमच्यापैकी बऱ्याचजणांनी खूप चांगले कार्य केले आहे, अनेक प्रश्न व अडचणी सोडवल्या आहेत. पण तरीही तुमच्यामधलेच काही लोक अजूनही डबक्यातील दुर्गंधातच रमले अहेत हे दुर्दैव आहे.

आज तुम्ही माझा वाढदिवस साजरा करत आहात याचा मला आनंदच आहे. तुम्ही सारी सजावट सुंदर केली आहे. खरं तर तुम्हीच माझे अलंकार व भूषणे आहात; सबंध जगाच्या दृष्टिसमोर माझी मुले प्रतिष्ठित, सूज्ञ व जाणकार नागरिक म्हणून पडावीत असेच मला वाटते. माझ्या जीवनात क्षणोक्षणी माझे तुमच्याकडे चित्त आहे आणि तुम्ही विशेष व आदर्श योगी बनावे म्हणूनच माझी सारी **धडपड आहे. तुम्ही उन्नत होऊन पूर्णपणे निर्मल व शुद्ध बनाल तो दिवसच तुमचा व माझाही खऱ्या अर्थाने वाढदिवस होईल.** हे मुद्दाम म्हणण्याचे कारण हेच की माझ्या कानावर काही अनुचित प्रकार घडत असल्याचे आले आहे आणि ते धक्कादायक आहे. त्या लोकांना आपण कोण आहोत हेच अजून समजले नाही हा त्याचा सरळ अर्थ आहे. म्हणूनच तुम्ही आधी 'स्व'ला जाणा हे मी सतत सांगत आले आहे; तोच आत्मा आहे, तोच सर्वव्यापी परमेश्वराचे तुमच्यामधील प्रतिबिंब आहे, म्हणून तुम्ही सामान्य माणसासारखे वागून चालणार नाही. तसे वागायचे असेल तर तुम्ही सहजयोग सोडून देणे बरे. पण तुम्हाला खरोखरच सहजयोगाबद्दल आत्मीयता असेल तर वर सांगितलेल्या वाईट गोष्टी सोडून द्यायलाच पाहिजेत.

कुण्डलिनी जागृत होऊन वर येते तेव्हा मार्गातील सर्व चक्रांना प्रकाशित करते. म्हणून **मी जरी तुम्हाला तुमच्या चुकांची क्षमा केली तरी कुण्डलिनी तुम्हाला शिक्षा देणारच.** अर्थात काही एका मर्यादेपर्यंत ती तुम्हाला मार्गावर आणण्याचा प्रयत्न करेल, पण तुम्ही सुधारला नाहीत तर तुमचे काय होईल मलाही सांगता येणार नाही. सहजयोगाची दारे सर्वांसाठी उघडी असतात, कार्य करण्याबद्दल कुणावरही बंधन नसते पण **तुम्ही आत्म्याच्याच विरोधात घाणेरडे व चुकीचे उद्योग करत असलात तर सहजयोगात तुम्हाला जागा नाही** आणि तुम्ही बाहेर फेकले जाणारच.

म्हणूनच तुमचे चारित्र्य कलंकित वा अमंगल होणार नाही याची खबरदारी घ्या. आजच्या या शुभदिनी तसा निश्चय करा; अगदी लहानसहान गोष्टींमधून व वागण्याच्या पद्धतीमधून हा गुण दिसला पाहिजे. म्हणजे त्याचा आनंद काय असतो हे तुम्हाला समजेल. इतके तुम्ही पवित्र व निर्मल बनले पाहिजे. तुम्हाला पुनर्जन्म मिळाला आहे तर तुम्ही या नवीन जीवनात उन्नत व प्रगल्भ बनले पाहिजे. कधी कधी लहान मुलांच्या वागण्यातूनही पूर्वजन्मी हे संत असावेत असेच वाटते. सहजयोगी म्हणून आपली जबाबदारी काही लोक ओळखत नाहीत याचे कधी कधी आश्चर्य वाटते. तुम्हा लोकांची एकंदरीत स्थिति आता चांगली आहे, तुमच्यापैकी काहीजण महायोगी म्हणण्याइतके पुढे गेले आहेत हेही मला माहीत आहे. **पण आपली आतमधील वाढ पूर्णपणे होऊन आपला आत्मा हिऱ्या-माणकांसारखा तेजस्वी होईल. हे ध्येय तुम्ही प्रत्येक सहजयोग्याने ठेवले पाहिजे व त्याचाच ध्यास धरला पाहिजे** तुम्हाला 'योग' मिळाला आहे, चक्रांची माहिती आहे, दुसऱ्यांची कुण्डलिनी कशी जागृत करायची, त्यांना 'क्लिअर' कसे करायचे, स्वतःचे व दुसऱ्यांचे आजार कसे बरे करायचे इ. सर्व ज्ञान तुम्हाला प्राप्त झाले आहे. तेव्हा आता आळस झटकून तुम्हाला कार्यप्रवीण बनले पाहिजे. पूर्वजन्मी साधक होता म्हणून तुम्हाला आता सहजयोग मिळाला. मग **तरीही तुम्ही फालतू गोष्टींच्याच मागे लागलात तर तुमची स्वतःची वाढ होणार नाहीच पण दुसऱ्यांना वाढ**

**सगळ्यांचे माझ्यावर फार प्रेम आहे पण सहजयोगासाठी ते काही करणार नाहीत. शिवाय 'हे सहजयोगी आहेत.' असे इतरांनी म्हणावे, असेही हे लोक स्वतःस घडवीत नाहीत. तेव्हा आता आपण असे काहीतरी करावे की त्याच्यामुळे आपल्या असे सांगता येईल, की या माणसाने इतके महान कार्य केले, त्या व्यक्तीने ते मोठे काम केले.**

**करण्यासाठीही तुमचा उपयोग होणार नाही.** म्हणून स्वतःच्या प्रगतीकडे लक्ष ठेवा, आपण क्रमाक्रमाने कशी प्रगती साधली हे समजून घ्या. सहजयोगी कधीच कठोर मनाचा नसतो किंवा उद्धट भाषा वापरत नसतो; उलट ज्याच्या प्रेमाला सीमा नाही, जो नेहमी दुसऱ्यांची काळजी घेतो, जो उदारपणाने वागतो तोच खरा सहजयोगी. तुम्ही विशेष लोक आहात आणि हे तुमचे वेगळेपण तुमच्या आचरणातून दिसून आले पाहिजे **तुम्ही माझे वैभव आहात आणि तुमच्या जीवनामधूनच तुमचे असामान्यत्व सबंध जगाला प्रभावित करणार आहे.** माझ्या हे सर्व सांगण्याचा एकच उद्देश आहे की तुम्ही उत्तरोत्तर सहजयोगातून उन्नतीच्या वरवरच्या टप्प्यावर या व अधिकाधिक प्रगल्भता मिळवा. दिवसागणिक आपण काय अनुभवले, काय पाहिले त्या सर्वांचा अर्थ समजून घ्या. मला समोर आलेल्या व्यक्तीची कुण्डलिनी क्षणात दिसून येते व तो माणूस कोण आहे, कसा आहे हे समजते. त्याच्या पाठीमागची शक्ति म्हणजे माझे अव्याहत प्रेम. हे प्रेम म्हणजे खूप खोलवरची भावना असते व त्यात आत्मीयता असते. तुम्ही लोकांनी चांगली प्रगति केली आहे व या सामूहिकतेचा आनंद मिळवत आहात याचे मला फार समाधान आहे.

मी आजपर्यंत तुमच्यावर कसले निर्बंध लादले नाहीत पण **तुमची परीक्षा सतत होत आहे याचे भान ठेवा;** ते तुमच्या हितासाठीच आहे. फक्त या परीक्षेत विद्यार्थी आणि परीक्षक दोन्ही तुम्ही स्वतःच आहात आणि तुम्हीच स्वतःची गुणवत्ता ठरवणारे आहात. त्यातूनच आजपर्यंत कधी न जाणवलेल्या गोष्टी तुमच्या लक्षात येत जातील आणि तुम्हाला खऱ्या अर्थाने ज्ञानप्राप्ति होईल. म्हणजेच तुम्हाला प्रत्येक क्षणी प्रत्येक व्यक्तीचे, घटनेचे वा परिस्थितीचे समग्र आकलन होईल. ही स्थिति मिळवण्याची क्षमता व शक्ति तुमच्याजवळ आहे पण आधी तुम्ही चांगली गहनता मिळवली पाहिजे. उदा. खोल विहिरीतील पाणी काढण्यासाठी रिकामी बादली विहिरीच्या तळापर्यंत पोचवावी लागते; त्यात आधीच दगड भरले तर काय उपयोग? सहजयोग तुम्हाला हेच शिकवतो. हा प्रयत्न सातत्याने करण्यातच मोठा आनंद आहे. फालतू गोष्टींच्या वा पैशाच्या मागे लागण्यात नाही.

कुण्डलिनी ही शुद्ध इच्छा आहे. माणसाच्या बाकी इच्छा कधी संपतच नाहीत. कारण एका इच्छेतून दुसरी इच्छा निर्माण होते. म्हणून काही उद्योगही सुरुवातीला भरभराटीमध्ये चालतात पण नंतर त्यात मंदी येते. तुमच्या प्रत्येक क्रियेतून प्रतिक्रियाच निर्माण होते. अध्यात्मिक सत्य मात्र तसे नसते. त्याची अनुभूति सदैव सुंदर व सुवासिक फुलासाखी पसरतच जाते. आत्म्याच्या संपर्कात राहणे हा अवर्णनीय व चिरकालीन अनुभव आहे. त्यासाठी भौतिकातील सर्व वायफळ गोष्टी कटाक्षाने टाळा म्हणजे तुमच्या मनात शंकाकुशंका, असमाधान याना थाराच राहणार नाही. पण काही लोक अजूनही खालच्या स्तरावर आहेत हे मी बोलले नसले तरी जाणून आहे. कारण सध्याच्या काळातच त्यांचे बुरखे फाटणार आहेत. मग सहजयोगामध्ये त्यांची काय किमत राहणार? सहजयोगात तुम्ही अध्यात्मिक उन्नतीसाठी आला आहात म्हणून तुमची दृष्टि सतत शिखराकडे असली पाहिजे; म्हणजे आपल्याला अजून किती चढायचे आहे याचे भान येईल. नाही तर भौतिकाच्या मायाजाळातच अडकून रहायचे असेल तर सहजयोग कशासाठी घ्यायचा? म्हणून अध्यात्मिक प्रगतीच्या प्रयत्नात रहा. त्यासाठी सर्वप्रथम तुम्ही पूर्णपणे शुद्ध व निर्मल बनले पाहिजे व ते सहजयोगातूनच साध्य होते. त्याचबरोबर साक्षीभाव दृढ करण्याचा प्रयत्न करा. जसजसा साक्षीभाव बाणत जाईल तसतसा अहंकार प्रतिअहंकाराचा प्रभाव कमी होत जाईल. त्यातूनच पुढे पूर्ण ज्ञान होणार आहे. म्हणून आचरणातील शुद्धता व निर्मलता फार महत्त्वाची आहे व त्या स्थितीला तुम्हाला यायचे आहे.

तुम्ही माणसेच आहात तेव्हा चुका करणारच; पण त्यामुळे नाउमेद होऊ नका व स्वतःचा धिक्कार करू नका. तुमची अध्यात्मिक शक्तीच तुम्हाला सुधारण्यासाठी बळ देईल. यासाठी **सतत आत्मपरीक्षण तुम्हाला केले पाहिजे. आपल्या आत्म्याकडे पहात चला आणि आत्म्याच्या विरोधात काय आहे हे शोधत चला. या ज्ञानाची तुमची इच्छा जितकी शुद्ध होईल तितके ज्ञान तुम्हाला मिळेल.** या ज्ञानाचे समाधान त्याच्यातच सामावलेले आहे; त्यातून तुम्ही अंतर्बाह्य स्वच्छ होता व उन्नतीची तुमची तळमळही बळकट होते. मला पुन्हा पुन्हा कुण्डलिनीबद्दलही उल्लेख करावासा वाटतो. कारण **तुमची कुण्डलिनी पूर्ण क्षमतेने जागृत व कार्यान्वित झाल्यावरच तुमचा आत्मा प्रकाशित करणार आहे, म्हणून तिच्या उत्थानामध्ये तुमच्या वागण्यामुळे अडथळे येत राहिले तर त्यात तुमचेच नुकसान आहे.**

मी १९७० साली सहजयोग सरू केला. त्याआधी मला करता आला नाही किंवा त्यावेळेचे लोक फार खराब होते असे नव्हे; तर मला वेगळेवेगळ्या स्थितीची कुण्डलिनी जाणून घ्यायची होती व ते सर्व अभ्यासून सर्वांची कुण्डलिनी जागृत होऊ शकेल असा सोपा मार्ग हवा होता. शिवाय लोक वाटेल त्या प्रवृत्तींकडे चालले असल्याचे व आपआपसातील प्रेमसंबंधांना विसरत चालल्याचे मला दुःख झाले. या सर्वाचे मूळ संतुलन बिघडण्यामध्ये आहे हे माझ्या लक्षात आल्यावर मानवांवरच कार्य करण्याचे मी ठरवले. आत्मपरीक्षण केल्यास या असंतुलनाची कारणे तुमच्या

लक्षात येतील व तुम्हाला सुधारणा करता येईल. त्याचबरोबर आपल्या चक्रांकडे जाणीवपूर्वक लक्ष ठेऊन ती स्वच्छ करता येतील. अशा अभ्यास व अनुभवातूनच तुम्ही प्रगल्भ व्हाल. पूर्वीच्या काळी संतमहात्म्यांनीही खूप कार्य केले पण त्यांना कुण्डलिनी जागृत करता आली नाही आणि तेच तुम्हाला मिळाले आहे. म्हणूनच तुम्ही इतरांबद्दल कळकळ बाळगून त्यांना मदत केली पाहिजे. आत्म्याचे सर्व कार्य प्रेमामधून चालते. दुसऱ्याबद्दल प्रेम न वाटणे म्हणजे स्वतःमध्येच काही कमतरता आहे हे लक्षात घ्या; दुसऱ्या सहजयोगाबद्दल प्रेम न वाटणे याच्यामागे आपला हेवा, असूया किंवा लोभ ही भावना तर नाही ना हेही तपासा. बंधुत्वाची एकात्मता नेहमीच आनंददायक असली पाहिजे. इथल्या सजावटीमध्येही एक प्रकारचा सुसंवाद जाणवतो. कारण त्याच्यामागे प्रेम आहे, अशी एकात्मतेची भावना माणसामाणसात सगळीकडे पसरली पाहिजे. त्यातून मिळणारा आनंद हाच आत्मानंद. या स्थितीवर येण्याचा ध्यास तुम्ही घेतला पाहिजे.

तुम्हाला मानवजातीसाठी खूप कार्य करायचे आहे आणि त्यासाठी तुम्ही शक्तिशाली बनले पाहिजे. गहनता मिळवल्यावर कार्याबद्दलच्या तुमच्या शंका, अडचणी, अनिश्चितता, भीति सर्व काही दूर होतील. कारण तुम्हाला आतूनच पूर्ण मार्गदर्शन मिळेल. एकदा तुमचा आत्मा पूर्णपणे प्रकाशित झाला की, त्याच्या सर्व शक्ति, धैर्य, सूज्ञता व विवेक तुम्हाला मिळणार आहेत. त्यात अतिरेकीपणा, क्रूरता, निर्दयपणा नसेल. उलट धैर्य व संयम राखून दुसऱ्यांसाठी नम्रतेने कार्य करण्याची कृतिशीलता असेल.

तुम्ही लोक आता परमचैतन्याशी जोडले गले आहात आणि तेच सर्व काही घडवून आणणार आहे. तुमच्यामध्ये बरेच चांगले सहजयोगी आहेत; पण कुणी भ्रष्ट, पैशाच्या वा अधिकार मिळवण्याच्या मागे लागलेला, अरेरावी करणारा सहजयोगी आढळला तर मला कळवा. सध्या एक प्रकारचे धर्मयुद्ध चालले आहे म्हणूनच तुम्ही सर्वांनी खंबीरपणे विश्व-निर्मल धर्माची कास धरली पाहिजे. धार्मिकपणा पूर्णपणे अंगी बाणल्याशिवाय सहजयोगात तुम्ही काहीही मिळवू शकत नाही. अधार्मिक (negative) लोकांना सहजयोगात स्थान नाही. पाश्चात्य सहजयोग्यांमध्ये अनैतिकतेचे प्रश्न होते आणि भारतीय सहजयोग्यांमध्ये अप्रमाणिकपणाचे दोष आहेत. भारतात भ्रष्टाचार सर्वत्रच पसरला आहे आणि त्याचा शिरकाव सहजयोगातही झाला आहे. अशा **भ्रष्ट लोकांना त्यांचीच कुण्डलिनी शिक्षा करणार आहे.** आजकाल सर्वच देशांमध्ये काही ना काही विचित्र प्रकार चालले आहेत. पण तुम्ही लोक परिपूर्ण व आदर्श लोक आहात हे तुम्हालाच जगासमोर सिद्ध करून दाखवायचे आहे आणि त्या अत्युच्च स्थितीचा आनंद उपभोगायचा आहे.

आजच्या दिवशी तुम्ही मला समजून घ्याल व मी सांगितलेल्या गोष्टी नीट ध्यानात घ्याल अशी मला आशा आहे. सहजयोगाला कमीपणा आणणाऱ्या लोकांच्या कारवायांमुळे मी व्यथित आहे; मला सर्व काही समजत असते याची त्यांनीही नोंद घ्यावी आणि शिक्षा मिळाली तर त्यात मला दोष देऊ नये. सहजयोगाजवळ त्यांना फिरकता येणार नाही हे उघड आहे. सहजयोग सर्व काही शुद्ध करत असतो. तुम्ही स्वतःच स्वतःमध्ये सुधारणा करायची आहे. तसे कराल तर ठीक, नाहीतर स्वतःच स्वतःचा नाश करून घ्या. तुम्हाला सर्व जग सुधारायचे आहे. माझ्या हयातीत सहजयोग इतका बहरेल असे मला वाटत नव्हते. पण महिलांना त्या बाबतीत अजून खूप काम करायचे आहे. कारण प्रेम व सहनशीलता त्यांच्याजवळ जास्त असते. तुम्ही सर्वांनी इतके चांगले सहजयोगी व्हा की, सर्व जगाला सहजयोगाची महती कळेल. आपल्याला या पृथ्वीतलावर एक नवीन सुंदर जग निर्माण करायचे आहे. तुमच्यामधील शक्ती, सूज्ञता व धैर्यच तुमच्याकडून फार महान कार्य घडवणार आहे. हे कठीण तर नाहीच पण आनंददायक आहे.

तुमचा वाढदिवस नवीन, समजदार व प्रगल्भ व्यक्तिमत्व मिळून साजरा होवो या माझ्या शुभेच्छा व आशीर्वाद. तेच तुमचे आत्मस्वरूप असेल.

सर्वांना अनंत आशीर्वाद.

●●●

**तुम्ही आता संत झाल्याने एक दुसऱ्यावार टीका करणे सहजयोगांत निरर्थक आहे. एखाद्या व्यक्तीमध्ये काही दोष असल्यास त्याचे दोष पाहून तुमच्यामध्ये चांगलेपण येणार नाही. तुम्ही स्वतःचे दोष पाहा व दुसऱ्यामध्ये काय चांगले आहे ते पाहा.**

# वाढदिवस सोहळा २००१

दरवर्षीप्रमाणे प. पू. श्रीमाताजींचा ७८ वा. वाढदिवस दिल्लीमध्ये दि. १९ मार्च ते २१ मार्च २००१ या तीन दिवसात अत्यंत उत्साहात व चैतन्यमय वातावरणात साजरा झाला. या तीन दिवसात पार पडलेल्या सोहळ्यात खालील कार्यक्रम झाले.

**सोमवार दि. १९/३/२००१ :**

रात्री साडेआठ वाजता कार्यक्रमास सुरवात झाली.

स्वागतगीत वंदना करे वंदना; नंतर श्री. नरगिलकरांनी प्रस्ताविक केले.

निर्मल संगीत सरीता, नागपूर

आकांक्षा : तुम धरती आकाश हमारी माता.
तुम आशा विश्वास हमारी माता.
प्रसाद खापर्डे : गायन राग यमन
अरुण आपटे : गायन राग बागेश्री
गाओ मंगल गाओ
सिम्पल : गायन

राजेंद्र प्रसन्ना : बासरीवादन राग जयजयवंती

निजामुद्दिनच्या कलाकारांनी कवाली सादर केली.

**मंगळवार दि. २०/३/२००१**

समारंभाची सुरवात, ३ महामंत्रांनी झाली.

साडेदहाच्या सुमारास भगवतीचे साकार रूपात आगमन. नंतर कवालीचा कार्यक्रम.

सर. सी. पी. श्रीवास्तव साहेब, श्री शर्मा संसद सदस्य, जगन्नाथ पहाडिया माजी मुख्यमंत्री राजस्थान यांचे भाषण झाले.

**श्री माताजीच्या वाढदिवसनिमित्त आलेले शुभेच्छा संदेश वाचून दाखवले. पुष्कळ देशामध्ये २१ मार्च हा विश्व निर्मल दिवस साजरा केला जातो असे संदेशही होते.**

इटली सहजयोग परिवाराने जोगवा म्हटला. शिवप्रसाद यांचा व्हीसल विझार्ड हा शिट्टीवर निरनिराळ्या रागदारीचा कार्यक्रम.

कवाली

वंदे मातरम

**बुधवार ता. २१/३/२००१**

पूजा दिवस

तीन महामंत्रांनी सुरवात झाली.

भजन - जनमदिन आयो

हर सांस मे हो सुमिरन तेरा - सिंपल

अबीर गुलाल - अरुण आपटे

माँ का नाम अती मिठा है ।

जयजय दूर्गे माता भवानी

**९.३० वा. श्रीमाताजींचे प्रवचन**

गणपती अथर्वशिर्ष

**भजन** : हेमजासुतं भजे

तुझ्या पूजनी अर्चनी

जागो सबेरा आया है

हासत आली निर्मल आई

विश्ववंदिता

आरती

**प्रेझेंटस् : सर्व देशातील सामुहिकतेने भेट अर्पण केली. त्यावरोबर भजने झाली.**

जब हृदयमे बसी मेरी माता

तुम आये है प्यार बनके

जनम दिन आयो आदिशक्तीका

बोलो आदिशक्ती की जय निर्मल माताजी की जय

कार्यक्रमाची सांगता

# दिल्ली पब्लिक प्रोग्राम

## प. पू. श्री माताजी निर्मला देवी यांचे भाषण

(सारांश)

दिल्ली २६ मार्च २००१

सत्य शोधणाऱ्या आणि ज्यांना सत्य समजलं आहे अशा सर्व साधकांना प्रणाम !

दिल्लीमध्ये सहयोग इतक्या मोठ्या प्रमाणावर पसरेल असे पूर्वी कधीच वाटले नव्हते. पूर्वी सुरुवातीला इथे सर्वत्र सत्ता किंवा पैसा यांच्यामागे लागलेल्या लोकांचा प्रादुर्भाव होता. पण त्यातील व्यर्थता लक्षात येत असल्याचे हळु हळु दिसून येऊ लागले. सत्ता व पैसा यामध्ये वास्तविकता नसल्याचे लोकांच्या लक्षात येऊ लागले. कारण म्हणजे त्यांच्यापासून मिळणारे सुख व आनंद क्षणभंगूर असतो म्हणून दिल्लीमध्ये लोकांच्या मनात एक जागृति निर्माण झाली. तसे होणे हे तुम्हा लोकांचे भाग्य आहे. त्याच्यामागे माझी छाप किती होती मला माहीत नाही, पण लक्षात घ्यायची गोष्ट म्हणजे तुमच्या हृदयातील प्रेम व शुद्ध इच्छेमुळेच हे शुभकार्य इतक्या चांगल्या प्रकारे इथे होऊ शकले.

या भूमीमध्ये पूर्वीपासून अनेक थोर संतपुरुषांनी महान कार्य केले. घराघरातून त्यांचा आदर राखला जात असे. हळुहळु संतांच्या थोर पारमार्थिक कार्याबद्दल लोकांची उत्सुकता वाढू लागली. एरवी पैसा व सत्तेमध्येच गुरफटलेले काही लोकही सहजाकडे वळले. कारण त्यांच्या त्याआधीच्या धडपडीमधून त्यांना आनंद मिळत नव्हता; शांति व समाधान नसल्यामुळे जीवनामधील खरा अर्थ त्यांना समजला नव्हता. पण त्यांनी सहजयोगाचा स्वीकार केला व ज्योतीमधून ज्योत उजळावी तसा सहजयोग फोफावला म्हणूनच आज हजारो लोक इथे जमले आहेत.

माणसामध्ये असलेल्या अनेक उणीवांचे मुख्य कारण म्हणजे माणसाला धर्म म्हणजे काय हे नीट समजत नाही. त्यामुळे धर्ममार्तंड पंडित जे सांगत आले त्यालाच लोक सत्य समजून चालत आले; व्रत, अनुष्ठान, उपास-तापास हे प्रकार वाढले. मुसलमान फकिरांनीही तेच केले. कालांतराने लोकांना या कर्मकांडाचे फळ दिसेनासे झाले. पण या कलियुगामध्ये आता ते फळ मिळण्याचा काळ आला आहे. लोकांना सत्याप्रत नेणारा हा समय आहे. ''सत्य हेच प्रेम, प्रेम हेच सत्य आहे.'' सत्य मिळण्यासाठी संसार सोडून, मुंडन करुन संन्याशाची वस्त्रे घेण्याची जरूरी नाही. त्यासाठी तुमच्यामधील सुप्त अवस्थेत असलेली कुंडलिनी शक्ति जागृत व्हायला हवी. ह्या शक्तीच्या अस्तित्वाबद्दल नुसत्या शंका घेऊन फायदा नाही. प्रत्येक मनुष्यप्राण्यामध्ये पाठीच्या कण्याच्या शेवटी असलेल्या त्रिकोणाकृति माकडहाडामध्ये ही शक्ति असते. सत्य जाणण्यासाठी ही शक्ति जागृत होणे आवश्यक आहे. त्याशिवाय माणूस 'स्व'तःला जाणू शकत नाही. प्रत्येक माणसाला काम, क्रोध, लोभ इ. षड्रिपू सतावत असतात. लक्षात घेण्याची गोष्ट म्हणजे या सर्व त्रुटि माणसाच्या बाह्यांगाचा अंश आहेत. वास्तविक आत्मा हा शुद्ध व निर्लेप आहे पण परंपरा, पूर्वजन्म, वंशप्राप्त इ.मधून त्या त्रुटि आल्या असल्या पाहिजेत. अशा विचारात गुंतण्यापेक्षा त्या दूर करून आत्म्यावरचे त्यांचे पटल बाजूला कसे कारता येईल हे समजण्यात शहाणपण आहे व त्याची व्यवस्था त्या परमात्म्याने तुमच्यामध्येच करून ठेवली आहे. म्हणून माणसाला जन्मजात मिळालेल्या स्वातंत्र्यामधून कुण्डलिनी जागृत करण्याची प्रक्रिया अनुभवण्यामध्ये तुमचेच हित आहे हे मी सांगत आहे असे नाही; अनादि कालापासून या भारतभूमीमध्ये अनेक थोर महात्म्यांनी कुण्डलिनीबद्दल सांगितले आहे. अर्थात कुण्डलिनी जागृत करण्याची शक्ति फार थोड्यांना प्राप्त होती व त्या कार्याची वाटचाल फार खडतर होती. पण आता ही प्रक्रिया सामूहिक स्तरावर शक्य झाली आहे. त्याचा प्रत्यक्ष अनुभव अनेकांना मिळाला आहे. हा अनुभव व कुण्डलिनी जागृतीची चैतन्यस्वरूप अनुभूति मिळाल्यावरच माणसाला आपले 'स्व'रूप समजते व आपण तोपर्यंत भ्रमातच वावर होतो हे लक्षात येते.

हे जाणण्यासाठीच सर्वप्रथम आपण चराचरांत व्यापून राहिलेल्या सर्वव्यापी चैतन्यशक्तीबरोबर जोडले गेले पाहिजे. कुण्डलिनी जागृतीशिवाय त्यासाठी दुसरा कुठलाच मार्ग नाही. पण लोक तुम्हाला मुरळ पाडून कसल्यातरी बुकीच्या मार्गाकडे नेतात. उदा. लोकांना सांगतात की प्रवृत्तींच्या मागे लागल्यामुळे तुमची धावपळ संपत नाही म्हणून तुम्ही कुणा गुरुची कृपा

मिळवून त्याची सेवा करा व त्याला पैसे द्या, म्हणजे स्वतःलाच गुरु म्हणवून घेतात. मग लोक आंधळेपणाने त्यांच्याच मागे लागतात. त्यातून माणूस स्वतःबद्दलचा आत्मविश्वास गमावतो. तुमच्यामध्येही कुण्डलिनी जागृतीचा अनुभव प्रत्यक्षपणे घेतलेले व त्यामधून आत्मस्वरूप जाणलेले अनेक लोक इथे उपस्थित आहेत. तुम्ही सर्वजणही ते प्राप्त करून घेऊ शकता. ही शक्ति प्रत्येकाजवळ आहे. कुणीहि त्याबाबतीत कमीपणा वाटून घ्यायला नको. कुण्डलिनी आपल्या जागी आहेच, कुणीतरी येऊन जागृत करावी याची ती वाट पहात असते. ती जागृति झाली की तुमच्या सर्व वाईट प्रवृत्ति व षड्रिपू नाहीसे होतात. एखादे बी मातीमध्ये टाकल्यावर ते आपोआप अंकुरते तशी ही घटना आहे.

सध्या या कलियुगामध्ये अनके वाईट प्रथा पडल्या आहेत, पण या घोर कलियुगातच ही घटना घडणार आहे व तोच आत्ताचा समय आहे. कुण्डलिनी जागृत झाल्यावर तुमचा आत्मा प्रकाशात येतो व तुम्ही 'स्व'तःला जाणता. मग तुम्ही स्वतःमधील दोष नीट समजता व ते दूर करून स्वतःला शुद्ध बनवू शकता. स्वतः आत्मस्वरूप असल्याचे जाणणे हेच सत्य जाणणे, मग सर्व असत्य गोष्टींचा तुम्ही सहज त्याग करता. आत्मा प्रकाशात आल्यावरच तुम्ही सत्य काय व असत्य काय हा फरक समजू शकता. तोपर्यंत असत्य गोष्टींच्या मायाजाळातच अडकून राहता. जगात आज सगळीकडे धर्माच्या नावाखाली भांडणे चालली आहेत. हा याचाच परिणाम.

कुण्डलिनी जागृत झाल्यावर तुमचा संबंध परमेश्वराच्या सर्वव्यापी शक्तीबरोबर जोडला जातो. हा संबंध ही फार मोठी घटना आहे. आईनस्टाईनसारख्या महान शास्त्रज्ञानेही म्हटले आहे की, Torsion Area बरोबरसंपर्क झाल्यावर अकस्मात नवनवीन कल्पना तुमच्या बुद्धीमध्ये प्रकट होतात. पण कुण्डलिनी फक्त जागृत करून घेतल्यावर लगेच सर्व फायदे मिळतात असे नाही, तर नियमित ध्यान करून हा अनुभव स्थिर व्हावा लागतो. व त्याच्या गहनतेत येण्याचा अभ्यास करावा लागतो. ध्यानामधून तुमचे चित्त शांत होते व निर्विचार स्थिति प्राप्त होते. साधारण माणूस सतत कसला ना कसला विचार करत असतो. समोर येणाऱ्या प्रत्येक वस्तू व व्यक्तिबद्दल प्रतिक्रिया त्याच्या मनात उमटत असतात, त्यामुळे त्या वस्तूचे वा व्यक्तीचे सौंदर्य त्याला जाणवत नाही व त्याचा आनंद त्याला मिळत नाही. म्हणून प्रतिक्रिया करणे हीच मुळात चूक आहे व ते थांबले पाहिजे. ही प्रतिक्रिया नेहमी आपला अहंकार व प्रतिअहंकार यामधून होत असते. म्हणून साक्षीभाव ठेवला तरच समोर येणारी वस्तू आपण पूर्णपणे पाहू शकतो. कुणाकुणाला हे अवघड वाटेल पण कुण्डलिनी जागरणानंतर हे सहज घडून येते. कुण्डलिनी जन्मजात तुमच्यामध्ये आहे व ती तुमची स्वतःची आहे. तिच्यासाठी तुम्हाला पैसे पडत नाही. फक्त तिला जागृत करण्याची शुद्ध इच्छा तुमच्याजवळ असली की पुरे. एरवी आपल्या इच्छा कधी संपत नाहीत, एक मिळाले की पाठोपाठ दुसरी इच्छा होते. पण इच्छा शुद्ध असली की तिच्या पूर्ततेतून तृप्ति होते म्हणून कुण्डलिनीच्या जागरणानंतर मनाची एकामागोमाग दुसऱ्या वासनांमागची धावपळ शांत होते. जणू एखाद्या सुंदर, सुगंधी बागेमध्ये आल्यासारखे तुमचे मन शांति-समाधान-आनंद व प्रेमाने भरून पावते. सहजयोगामधून तुम्हाला हे सर्व विनासायास, सहज, पैसे मोजावे न लागता प्राप्त होते. आत्म्याला भेटण्याच्या तुमच्या शुद्ध इच्छेमुळेच तुम्हाला तो भेटतो. म्हणून 'माझी कुण्डलिनी जागृत होऊ दे' एवढी एकच इच्छा तुम्ही धरा व पार व्हा. जगभरातील अनेक देशांतील अनेक लोकांना हा अनुभव मिळाला आहे. मुस्लिम देशांतील मुसलमान लोकांनीही सहजयोग स्वीकारला आहे. उपास-तापास, तीर्थयात्रा, वेदपठण, कर्मकाण्ड इ. कशामुळेही आत्मसाक्षात्कार होत नाही. आत्मसाक्षाकारानंतरच 'आपण कोण आहोत' हे माणसाला समजते व आपली शक्ति व सामर्थ्य लक्षात येते.

मी परदेशात जाते तेव्हा त्या लोकांना कुण्डलिनी ऐकूनही माहीत नसतानाही ते पार होतात व चांगले कार्य

**सहजयोगात जन्मलेली बहुतेक सर्व मुले जन्मतःच आत्मसाक्षात्कारी असतात. त्यांना पोषक अशी शिकवण दिली तर एक दिवस, शहाण्या व जगाचे नेतृत्व करू शकतील अशा लोकांची पिढी तयार झालेली आपल्याला दिसेल.**

**तुमच्याकडे जे काही आहे त्याचे कारण तुम्ही सहजयोगी आहात हे आहे. म्हणून तुम्ही सहजयोगाची सेवा करायला हवी. कंजूष असाल तर तुम्हास लक्ष्मीतत्व प्राप्त होणार नाही.**

करतात. कधी कधी मग मलाच ते सहजयोगात आले याचे आश्चर्य वाटते. कुण्डलिनी जागरणाचे असे अनेक शारीरिक, मानसिक, बौद्धिक फायदे आहेत. आत्म्याला जाणणे हा एक अलौकिक अनुभव आहे व कुण्डलिनी जागृति हाच त्याचा एकमेव मार्ग आहे सहजयोग्यांनी इथे खूप कार्य केले आहे. सहजयोगाच्या सामाजिक संदर्भाकडेही आपण आता लक्ष देत आहोत. निराधार महिलांच सांभाळ, अनाथ बालकांना मदत, आरोग्य सेवा, वृद्धांना मदत, असे अनेक कार्यक्रम आपण हातात घेतले .आहेत. हे सर्व कुण्डलिनी जागृतीमधून मिळालेल्या शक्तीमुळे साध्य झाले. सहजयोग मिळाल्यावर संसार न सोडता समाजातच राहून त्याचा प्रसार करणे हे मुख्य कार्य आहे. त्यातूनच साऱ्या संसाराचा उद्धार करणारा सहज-समाज तयार होणार आहे. म्हणून नवीन लोकांना माझी विनंति आहे की त्यांनी कुण्डलनी जागृत करून घ्यावी व स्वतःमध्ये सर्व प्रकारची सुधारणा घडवून एक सुंदर व्यक्तिमत्व मिळवावे. त्यातूनच जगभरातील मानवसमूहामधील तंटे, वादविवाद नष्ट होतील; मारामाऱ्या, अत्याचार वगैरे अनिष्ट प्रकार थांबतील. कारण तुमच्या आत्मसाक्षात्कारी व्यक्तिमत्वाचा समाजावर प्रभाव पडेल. आजकालच्या विचित्र परिस्थितीमध्ये मनुष्य संभ्रमित झाला आहे. पण एक दिवस असा येणारच आहे की आत्म्याला जाणल्यानंतर लोकांच्या बुद्धीत प्रकाश पडेल व समाज सुधारेल. आज इतके वर्षांपासून चाललेले वाईट प्रकार उघडकीस आले आहेत त्यामागचा अर्थ लक्षात घ्या, व त्या दृष्टिकोनातून स्वतःकडे पहा; म्हणजे आपणही त्याच चुका करतो का हे तुमच्या लक्षात येईल. आजकाल भारतामध्येही जिकडे पहावे तिकडे लोक पैशाच्या मागे लागलेले दिसतात. आमच्याजवळचा पैसा समाजकार्यासाठी आहे. वाईट मार्गाने मिळवलेला पैसा ही लक्ष्मी नव्हे तर अलक्ष्मी असते व त्याने तुमचे नुकसानच होणार. परमचैतन्य सर्व पहात असते व त्या लोकांना बरोबर धडा देणारच. म्हणूनच लोकांच्या कल्याणासाठीच तुम्ही तुमच्यामधील शक्ति जागृत करा आणि निःस्वार्थ हेतू बाळगून कार्य करा; खरे तर स्वार्थ या शब्दाचा अर्थ 'स्व'चा अर्थ असा आहे; तो समजल्यावर चांगले व हितकारी कार्य करण्याकडेच प्रवृत्ति वळते. सहजयोगामधूनच ही सर्व परिस्थिति सुधारणार आहे आणि हे कार्य करण्याची जबाबदारीही सहजयोग्यांची आहे. चांगली समाज-व्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी सहजयोगाचा खूप प्रसार झाला पाहिजे; त्यातूनच माणसामाणसांमध्ये प्रेम-संबंध निर्माण होतील.

सहजयोगात कुण्डलिनी जागरणानंतर तुम्ही स्थिर होणे जरूरी आहे, मगच तुम्हाला मिळालेली शक्ति जागृत होणार आहे व तुम्ही सर्व मानवजातीचा उद्धार करू शकाल. हा निर्णय होण्याचा (Judgement) समय आहे. चांगल्या गोष्टींबरोबर रहाल तर तरून जाल व वाईट गोष्टींकडे वळाल तर आत्मघात करून घ्याल. सहजयोगात आल्यावर तुम्ही परमात्म्याच्या संरक्षण-छत्राखाली येता व तुमचे पूर्ण संरक्षण सांभाळले जाते. **अलिकडेच तुर्कस्थान व गुजरातमध्ये झालेल्या भूकंपामध्ये तेथील एकही सहजयोगी दगावला नाही वा त्यांची घरे पडली नाहीत. लातूरमधील भूकंपात तर आमच्या सहजयोगाच्या सेंटरच्या चारी बाजूंना जमिनीवर चर पडले आणि सेंटरची वास्तू सुरक्षित राहिली. एकही सहजयोगी दगावला नाही.** लातूरमध्ये गणेशोत्सवात काम करणाऱ्या लोकाना दारूची सवत होती व उत्सवाच्या दिवसातही मंडपामध्ये त्यांचा तमाशा चाले. विसर्जन झाल्यावर तर परत येऊन मंडपामध्ये त्यांचा गोंधळ चालू होता आणि त्याचवेळी भूकंप झाला. परमात्म्यांचे संरक्षण असे असते. सहजयोगात आजार बरे झालेले, व्यसने सुटलेले अनेक लोक तुम्हाला आढळतील.

लोकांमध्ये एक प्रकारचे परिवर्तन होण्याची सध्या फार जरूरी आहे. त्यानेच परिस्थिति सुधारेल व हे लोकांच्या लक्षात येऊ लागले आहे की सुधारणा मानवच करणार आहे. मला विश्वास वाटतो की या भागात सहजयोग मोठ्या प्रमाणावर आणखी पसरेल व विविध देशांमध्ये त्याचा प्रभाव पडेल.

सर्वांना अनंत आशीर्वाद.

●●●

**सहजयोगाचा प्रचार करणे ठीक आहे पण प्रत्यक्षात त्याचे परिणाम दिसले पाहिजेत. जोपर्यंत वागण्यामध्ये त्याचे परिणाम दिसत नाहीत तोपर्यंत दुसऱ्या लोकांच्यावर त्यांचा काही प्रभाव पडणार नाही.**

# दहा गुरूंची अवतरणे 'मोझेस'

इ. स. पूर्व १३-१४व्या शतकातील हेब्रू जमातीतील मोझेस हा एक प्रेषित व गुरु. त्याने इजिप्त लोकांच्या गुलामगिरीमधून आपल्या बांधवांना मुक्त करण्याचे कार्य केले. सिनाई यां डोंगरमाथ्यावर त्याने आपला पंथ स्थापन केला. त्याने केलेल्या उपदेशांचा प्रभाव अजूनही पाश्चत्य देशांमधील धार्मिक मानसिकतेवर, नीतितत्वांवर आणि सामाजिक जीवनशैलीवर दिसून येतो.

मोझेसचे माता-पिता इजिप्तमधील हेब्रु वंशातील होते. सुरुवातीला ही वेगळा असा वंश नव्हता पण त्या काळी हे लोक मोठ्या लोकांच्या घरी वा शेतावर काम करून उदरनिर्वाह करत म्हणून त्यांच्या भाषेत हा शब्द रूढ झाला. हे लोक बऱ्याच पिढ्यांपासून इजिप्तमध्ये रहात होते. कालांतराने त्यांच्यापासून असुरक्षितता वाटू लागल्यामुळे त्यांच्या मालकांनी (फारो) त्यांना कायमचे गुलामगिरीत जखडून टाकले. त्यानंतर या दोन्ही जमातींमध्ये कलह सुरु झाले. इजिप्तशियन सत्तेने प्रत्येक हेब्रू नवजात अर्भकांना ठार मारण्याचा केलेला कायदा मोझेसच्या जन्माच्यावेळी लागू असल्यामुळे त्याचा जन्म आईवडिलांनी कसाबसा गुप्त ठेवला व तीन महिने झाल्यावर त्याला टोपलीमध्ये घालून नाईल नदीच्या पाण्यात सोडले. फारोच्या राजकन्येला स्नान करत असताना प्रवाहात ही टोपली सापडली व तिने हे बालक राजवाड्यात आणले आणि त्याचे संगोपन केले. या कथेला ऐतिहासिक पुरावा नाही. पण इजिप्तशियन भाषेमध्ये 'मोझ'– is born– असा शब्द आहे. लहानपणापासून मोझेसला स्वाभाविकच धर्म, नीति, समाज, युद्ध हे शिक्षण मिळाले. मोठा होत असतानाच त्याला आपल्या जन्माचे रहस्य कुठून तरी कानावर आले व कालातराने तो आपल्या मूळ हेब्रू लोकांना भेटण्यासाठी बाहेर पडला. त्यावेळी तो अंदाजे चाळीस वर्षांचा होता असे समजले जाते. बरीच भ्रमंती केल्यावर तो हेब्रु लोकाना भेटला व त्यांच्यावर होत असलेले अत्याचार त्याने पाहिले. एका इउजिप्तशियन सरदाराला हेब्रु सेवकाला मारत असताना पाहून संताप येऊन त्या सरदाराला त्याने ठार केले.

त्यानंतर बऱ्याच प्रदेशातून भ्रमण करीत असताना त्याला एका वृक्षामधून अग्नीच्या ज्वाला निघत असल्याचे पण वृक्ष शाबूत असल्याचे अलौकिक दृश्य दिसले. या कथेचा खरेखोटेपणा सोडून दिला तरी त्या क्षणापासून माझेसला परमात्म्याच्या अस्तित्वणाची जाणीव झाली व दर्शन झाले. त्याचे नाव Yahweh (He who createas) असल्याचा संदेश मोझेसला मिळाला आणि हेब्रू समाजाला इजिप्तमधील जुलमी अवस्थेतून सोडविण्याचे कार्य करण्याची आज्ञा झाली. त्यानंतर तेथील सरदार- उमरावांबरोबर लढाया करत मोठ्या कष्टाने त्याने आपल्या लोकांना इजिप्तबाहेर काढले. या सर्व कठीण परिस्थितीत Yahweh देवच आपल्यावरील संकटे दूर करत आहे ही त्याची श्रद्धा होती. एकदा पाठीवर शत्रू असताना एका विस्तीर्ण जलाशयाच्या काठी हे सर्व लोक अडकले असताना अचानक पाण्यामध्ये कोरडा रस्ता तयार होऊन ते पार झाले तर पाठीमागचे शत्रूचे सैन्य पुन्हा पाणी येऊन वाहून गेले, अशी आख्यायिका आहे. सरतेशेवटी Sinai डोंगरावर त्याने आपल्या लोकांचा वेगळा पंथ व धर्म प्रस्थापित केले. इथेच त्याने दहा आज्ञा (Ten Commandments) जारी केल्या. हेब्रू बायबलमध्ये मोझेसबद्दल व त्याच्या उपदेशांबद्दल पाच प्रकरणे आहेत असे सांगण्यात येते की एके दिवशी डोंगरावरील एकांत व निर्जन पठारांवर तो अकस्मात अदृश्य झाला.

●●●

# अमृतवाणी

........ सहजयोगात प्रथम आल्यावर लोक दुसऱ्याकडे पाहून त्यांचे दोष शोधू लागतात. आपण कशाकरिता आलो आहोत हे पहात नाहीत. ते दुसऱ्याचे दोष पाहण्याकरिता आले नसून स्वत:मधील दोष सुधारण्यासाठी आलेले असतात.

........ एखाद्या लीडरने तुमच्यात काही चुकीचे आहे असे सांगितल्यास त्याच्यामुळे अवमानीत होण्याच्या ऐवजी जे चूक आहे ते पाहण्याचा प्रयत्न करा.

........ सूज्ञता म्हणजे वाद घालण्यास वा भांडण करण्यास शिकणे नव्हे. सूज्ञता याचा अर्थ प्रत्येक गोष्टीचा आनंद घेण्यासाठी त्याच्यातील चांगल्याची बाजू कशी घ्यायची, सर्व विनाशकारी गोष्टी टाळून, रचनात्मक काम कसे करायचे इत्यादी. शहाणा माणूस स्वत:स सांभाळतो. स्वत:च्या जीवनाचा आदर करतो. कारण आपण आता परमेश्वरांचे साधन आहोत हे तो जाणतो.

........ सूज्ञ लोकच सहजयोग समजू शकतात. तो मूर्ख आणि वेड्या लोकांसाठी तर नाहीच पण अतिशहाण्यांसाठी पण नाही. जसे ख्रिस्ताने म्हटले आहे. ''जे लीन असतील तेच पृथ्वीवर टिकतील. जे स्वत:चाच विचार करतील ते टिकणार नाहीत.''

........ सहजयोग्याची नवीन शिस्त आहे. ह्या नवीन शिस्तीत तुम्ही लीन असले पाहिजे, नम्र असले पाहिजे आणि सूज्ञ असले पाहिजे. तुमच्या बोलण्या-चालण्यातून सूज्ञता आणि शिस्त व्यक्त झाली पाहिजे.

........ खरा सहजयोगी मागे उभा राहतो आणि तेथूनच आनंद घेतो. कारण त्याला ठाऊक आहे की मी सर्वव्यापी आहे. तो मला भेटायची इच्छा धरत नाही आणि कसली घाई गर्दीही करत नाही. हीच लीनता होय.

........ तुम्ही ध्यानामध्ये अंतर्मुख होऊन "श्री माताजी कृपाकरून आम्हाला आत्मपरीक्षण करून आमच्यामध्ये काय दोष आहेत आणि सहजयोग्याला आवश्यक असणाऱ्या कोणत्या गुणांचा अभाव आहे ते पाहण्याची दृष्टी द्या." अशी प्रार्थना करा.

........ सहजयोग हे फक्त परमेश्वराचे कार्य आहे. तुम्ही करत असलेली प्रत्येक गोष्ट देवाकरता व स्वत:करता करीत आहात. इतरांवर टीका कमी करून आत्मपरीक्षण करणे महत्त्वाचे आहे म्हणजे तुम्ही स्वत:लाच हसाल व त्यामुळे तुमचा अहंकार नष्ट होईल.

........ पूर्ण एकाग्रतेने खोटेपणा व फसवणूक न करता स्वत:ला योग्य प्रकारे ओळखावे हे चांगले. तुमचे चित्त कोठे जात आहे ते पहा. तुम्ही तुमची प्रगति कशी करणार ते पहा. तुमची प्रगति दुसऱ्याचे दोष पाहून होणार नाही तर आत्मपरीक्षणानेच होईल.

........ तुम्ही तुमच या आयुष्यातून ख्रिस्तांना प्रतीत करा. ख्रिस्तांच्या पावित्र्य, लीनता, कनवाळूपणा व सूज्ञता यांना अनुसरून, निर्भयतेने तुम्ही फक्त परमेश्वराचीच भिती बाळगा, ना दुसऱ्या कोणाची.

........ सहजयोग हा आपल्या सर्वांकडेच पूर्वापार असलेला अमोल ठेवा आहे. हा एक भारतातलाच स्फुरलेला म्हणून भारतीय ठेवा आहे. म्हणूनच तुमची जबाबदारी जास्त आहे. कारण सर्व मानवांना शारीरिक व्याधींपासून मुक्तता, जीवनात शांती व समाधान, सामुहिकता व या सर्वांमुळे मिळणारा अखंड आनंद देणारं हे ज्ञान जर आपल्याकडे उपलब्ध आहे तर ते प्रत्येकाने प्रत्यक्ष का मिळवू नये?

........ तुम्ही शांत असता तेव्हा जास्त चांगलं काम करू शकता. शांत रहाणे म्हणजे कुणाशीही नमते घेणं नव्हे. सर्वजण जर शांत झाले तर ते एकमेकांना चांगले समजावून घेतील; त्यांच्यातील परस्पर संबंध सुधारतील.

...... प. पू. श्रीमाताजी निर्मला देवी

# सहस्रार पूजा

## प. पू. श्री माताजी निर्मला देवी यांचे भाषण

(सारांश)

रोम : ८ मे १९८८

आज सहस्रार उघडले जाण्याला अठरा वर्षे पूर्ण झाली. ही घटना होणार हे आधीच ठरले होते; तो दिवस फार महान होता. त्या दिवशी सर्व पस्तीस कोटी देव-देवता त्यावेळी स्वर्गात उपस्थित होत्या. सहस्रार उघडले जाणे ही मानवासाठीची उन्नतीची अखेरची पायरी होती; त्यातून मानव जाणीवेच्या नवीन व उच्च स्थितीला येऊन आत्मा जाणणार होता व परमात्म्याला भेटणार होता. अज्ञानाचा सारा अंधःकार दूर करणारी ही घटना सहजपणे घडून यावी अशी ही योजना होती. त्यासाठी सर्व देव-देवतांनी आदिशक्तीला (मला) प्रगट होण्याची विनंति केली. कारण तोपर्यंत त्यासाठीची त्यांची सर्व तपश्चर्या, अवतरणे, संतमहात्मे होऊनही पृथ्वीतलावर हे शक्य झाले नव्हते; उलट अनेक धर्म निर्माण होऊन उलटाच परिणाम झाला.

आतापर्यंतच्या सर्व धर्मांमधून सत्य कुणी जाणले नव्हते, सर्व धर्मांमध्ये पैशाचा प्रभाव होता वा सत्तेचा दृष्टिकोन बळावला होता. कारण त्या कार्यामागे परमेश्वरी शक्ति नव्हती; उलट सर्व काही परमात्म्याच्या विरोधातच चालत होते. त्यामुळे या चुकीच्या व विनाशकारी मार्गापासून माणसाला कसे परावृत्त करायचे हाच मोठा प्रश्न पडला होता. त्यासाठी सहस्रार उघडण्याशिवाय पर्याय नव्हता. हे फार प्रचंड कार्य होते व त्यासाठी पराकोटीचा संयम व प्रेमाची आवश्यकता होती. साध्यासुध्या भोळ्या लोकांनी त्यांना सांगितलेल्या धार्मिक उपदेशांवर श्रद्धा ठेवल्यामुळे हे कार्य हळुवारपणे घडवण्याची पण तितकीच जरूर होती. म्हूणनच अनेक संतमहात्म्यांचा वेळोवेळी छळ झाला होता. सहा मे हा दिवस तर फार उलथापालथ होण्याचा असल्यामुळे आदल्या दिवशी म्हणजे पाच मेला हे महान कार्य करावे लागले. सर्व देवदेवता मला पूर्णपणे जाणत असल्यामुळे, माझ्या शक्तीबद्दल पूर्ण खात्री असल्यामुळे त्यांचे पूर्ण सहकार्य मिळाले. परमेश्वरी प्रेमशक्तीमधून असेच सर्व काही घटित होत असते. एरवी माझी मुले, माझे घर, माझा देश इ. मर्यादा साधारण प्रेमभावनेमध्ये असतात त्यापेक्षा हे परमेश्वरी प्रेम फार उच्च प्रकारचे असते. त्याचा उगम हृदयातूनच, अर्थात आत्म्याकडूनच असतो.

म्हणून **या प्रचंड कार्यासाठी मला महामायारूप धारण करावे लागले.** त्यामुळेच या एकोणीस वर्षात एवढे प्रचंड कार्य जमून आले. आता माझ्यासमोरच इतके सारे योगी बसले आहेत. संत व योगी यातला फरक लक्षात घ्या; संत हा नीतीमान व पवित्र असला तरी त्याला कुण्डलिनी माहीत नसते; पण योगी कुणडलिनी जाणतो. पण सहजयोग्याचे त्यापुढचे वैशिष्ट्य हे क्री त्याच्याजवळ शक्ति असते, त्यामुळे तो दुसऱ्यांना आत्मसाक्षात्कार देऊ शकतो, स्वतःला व दुसऱ्यांना स्वच्छ करू शकतो. तुम्ही सर्वांनी पूर्वजन्मात खूप पुण्य कमावले असल्यामुळेच सहजयोगी बनण्याचे भाग्य तुम्हाला मिळाले. आजपर्यंतची तुमची साधना व शोध फलित झाला. तुम्हाला आता ही शक्ति अगदी सहजपणे मिळाली आहे व ते तुम्ही प्रत्यक्ष मज्जासंस्थेमधून जाणू शकता. हे सर्व एका क्षणात घटित झाले आणि त्यामधून तुमचे चित्त स्थिर व प्रकाशित झाले आहे. अर्थात तरीहि अजून काही लोक कच्चे आहेत, त्यांचे चित्त चटकन बाहेर धावते. बऱ्याच जणांनी ''शिवोऽहम्'' ही स्थिति मिळवली आहे. पण मी महामाया आहे हे नीट समजून घ्या. वरवर पाहिले तर मी तुमच्यासारखीच चालते, बोलते, तुमच्यासारखेच माझेही कुटुंब-घरदार आहे. पण तुम्ही जसजसे प्रगल्भ बनाल तसतशी तुमची विवेकशक्ति अधिकाधिक जागृत होईल; **या परमेश्वरी विवेकशक्तीचा पायाही प्रेम हाच आहे.** पण तरीही मला दिसते की तुम्हीसुद्धा चुका करता. उदा. काही लोक मलाच सांगतात की आमची आज्ञा पकडली आहे; पण हे सांगण्यापेक्षा तुम्ही स्वतःच ते ठीक का करत नाही? तसेच तुमच्या कुटुंबातील व्यक्तींचे प्रश्नही तुम्ही मलाच सांगत राहता आणि हीच माया आहे हे तुमच्या लक्षात येत नाही; तुम्ही मागे ओढले जाता पण मग पुन्हा नीट होता. ही माया कधी लक्षात न येण्या इतक्या सूक्ष्मपणे वावरत असते. तुमचे माणसा-माणसांबरोबरचे संबंधही सुधारतात. पति-पत्नीमधील संबंध बिघडल्यामुळे सहजयोगातही भरकटलेले लोक आहेत. पण प्रत्येकाला आपली अध्यात्मिक उन्नति

स्वत:ची स्वत:च करून घ्यायची आहे आणि जे तुमच्या उन्नतीच्या आड येतात त्यांना दूर केलेच पाहिजे. उत्तरोत्तर अधिक आत्मोन्नति साधण्यापेक्षा जास्त महत्त्वाचे दुसरे काहीही नाही. कारण त्यामागे अंतिम कल्याणाची परमेश्वरी योजना आहे.

सहस्राराच्या हजार पाकळ्या या तुमच्यामध्ये असलेल्या विराटाच्या शक्त्या आहेत. आपली चूक हीच होते की सहस्राराचा प्रकाश हे ब्रह्मरंध्र आहे व तिथेच हृदय-चक्र आहे हे तुम्ही लक्षात घेत नाही. हृदय-चक्रही बऱ्याच जणांना नीट समजत नाही. हे सर्व महामायेमुळे होते. उदा. प्रत्येकाला वाटते की आपल्या कुटुंबात सर्व क्षेम असावे आणि इथेच महामाया कार्य करू लागते व तुम्ही कुटुंबियांबद्दलच काळजी करू लागता. ''वसुधैव कुटुम्बकम्'' ही संतांची मनोभूमिका होती. तसे तुमचे झाले पाहिजे. **स्वत:च्या कुटुंबाची अशी काळजी घ्या की सहजयोग्यांचे सामूहिक कुटुंब बळकट होईल; तसे केले नाही तर उलट प्रकार होईल.** त्याबाबतीत त्याग हा एक प्रकारचा व्याधिमुक्त होण्याचा उपचार आहे. मग परिस्थिति बदलून प्रेम, करुणा, आपुलकी इ. भावनांना प्राधान्य येते. पण या बाबतीतही प्रत्येक सहजयोग्यावर प्रेमच केले पाहिजे असा नियम पाळण्याचा आग्रह धरू नये. निगेटिव्ह सहजयोग्याला दूरच ठेवले पाहिजे. कुठल्याही माणसाच्या प्रभावाखाली येणे बरोबर नाही. स्वत:ला अवतारी व्यक्ति समजून सगळ्या पीडितांचा आपणच उद्धार करणारे आहोत अशी कल्पना करू नका. हॉस्पिटलमधला पेशंट इतर पेशंटला औषध देऊ शकत नाही, ते डॉक्टरचे काम आहे. सहजयोगात नवीन आलेल्या लोकांना हे नीट समजत नाही. टोपलीमध्ये ठेवलेल्या सफरचंदामधील चांगली फळे खराब झालेल्या फळांना ठीक करू शकत नाहीत, उलट त्यांच्या संगतीत चांगली फळेच खराब होणार. म्हणून प्रत्येकाला सुधारण्याचे आपले कामच आहे असे समजू नका. **तुमचे खरे काम म्हणजे निगेटिव्ह सहजयोग्याला सामूहिकतेतूनच खडसावले पाहिजे व त्याचे दोष व चुका स्पष्टपणे त्याला दाखवल्या पाहिजेत.** जगामध्ये काही माणसे खराब असतातच. शिवाय चैतन्यलहरींमधून चांगले-वाईट ओळखणे तुम्हाला सहज शक्य आहे, म्हणून ज्यांना सुधारणे अशक्य आहे अशा लोकांवर तुमची चैतन्यशक्ति वाया घालवू नका; त्यातून तुमचेच नुकसान होण्याची जास्त शक्यता आहे. सहजयोगात अजून परिपक्व न झालेल्या लोकांनी या बाबतीत जास्त खबरदारी घेतली पाहिजे.

सहस्रार उघडण्याच्या महान कार्यामध्ये मी काहीही कमतरता राहू दिली नाहीये. तुमचा मेंदू, तुमच्या नसा यांना कसलाही धक्का न पोचता तुमची कुण्डलिनी वर आली; तिचे काही धागेच हळुवारपणे सहस्रारातून बाहेर पडले व तुम्हाला योग मिळाला; तुमच्या सिंपथेटिक संस्थेला आराम मिळाला, तुमची चक्रे ठीक करत कुण्डलिनीचे अधिकाधिक धागे वर येऊ लागले. मग तुम्हालाही कुण्डलिनी जागृतीची प्रक्रिया समजली व तुम्ही इतरांना जागृत करू शकता. पण अजून आपली सूक्ष्म यंत्रणा कमजोर आहे व आपल्याला परिपूर्णता मिळवण्यासाठी खूप कष्ट घ्यायचे आहेत हे तुम्हाला विसरून चालणार नाही. शिवाय महामाया तुमच्यावर सतत नजर ठेवून आहे. कधी कधी ती जाणूनबुजून तुमच्यावर भुरळ पाडते. तुमच्यावर मुद्दाम विशेष जबाबदारी (लीडर वगैरे) सोपवते; कधी कधी असे लोक स्वत:बद्दल डोक्यात विचित्र कल्पना घेतात. पण महामाया तुमची सतत परीक्षा घेण्यासाठी ही माया चालवते; पैलू पाडल्याशिवाय हिऱ्याला तेज येत नसते तसे हे आहे. चर्चमध्ये डोक्यावर पाणी शिंपडून बाप्तिस्मा देतात तसा हा प्रकार नाही. म्हणून या सर्व गोष्टींचा आपल्या अध्यात्मिक उन्नतीचा आशय ओळखून त्या नीट समजून घ्यायच्या असतात; त्यांचा उद्देश आपल्या कल्याणासाठी, प्रगतीसाठी असतो. त्यासाठी आपली इच्छाशक्ति प्रबळ असली पाहिजे. हिमालयावर चढून जाणारे लोक आपल्या पुढच्या उंचीवर लोखंडी सळई खोचतात व त्याचा आधार घेऊन वर-वर चढत जातात, चढतांना मागे खाली न बघता दृष्टि वर ठेऊन चढतात तसे हे आहे. **कुण्डलिनीच्या जागृतीची प्रत्यक्ष अनुभूति मिलाल्यावर तुम्हालाही त्यामध्ये हळु-हळु उंची गाठायची प्रबळ इच्छा बाळगून टप्प्याटप्प्यावर स्थिर व्हायचा प्रयत्न करायचा आहे.** त्यामध्ये कसल्याही गोष्टीचा त्याग करण्याची भावना बाळगण्याची मुळीच जरूरी नाही. उलट उन्नति मिळवण्याचा दृढ निश्चय हवा; त्याशिवाय तुमच्यामधील अज्ञानाचा डोंगर

**दुसऱ्या व्यक्तीचा केव्हाही गैरफायदा घेऊ नका.**
**सहजयोगात तुम्ही गैरफायदा घेऊ लागाल तर तुमचाही घेतला जाईल.**

तुम्ही पार करू शकणार नाही. खरं तर **आत्मसाक्षात्कार होतानाच तुम्हाला मी शिखरावर पोचवते पण तुम्हीच घसरायला लागता म्हणून शिखरावर खंबीरपणे टिकून राहण्याचा प्रयत्न तुम्हीच केला पाहिजे.**

कुण्डलिनी आणि चक्रांबद्दल मी तुम्हाला सर्व सांगितले आहे. पूर्वी कुणीही हे सांगितले नव्हते. आता तुम्हाला हातांच्या बोटांवर ते सर्व समजते. विज्ञान आता सत्याप्रत आले आहे व सहजयोग ही एक शास्त्रीय प्रणाली आहे. पण **तुम्ही मिळवलेली ही क्षमता आत्मा कार्यान्वित झाली पाहिजे; नाही तर सर्व काही वाया जाणार आहे. म्हणून आता तुम्ही तुमची जबाबदारी ओळखली पाहिजे.** आपल्याला सर्व मानवजातीचा उद्धार करायचा आहे. पण तुम्ही अजूनही तुमच्या सोयीप्रमाणे कार्य करायला बघता; सहस्रार पाच तारखेला असतो पण रविवार हवा असल्यामुळे तुम्ही आज तो साजरा करता. ते जाऊ दे. देव-देवतांकडे पहा, ते सदैव चोवीस तास कार्य करत असतात; त्यांच्याजवळ अखंड शक्तीचा प्रवाह आहे. आजपर्यंतच्या अठरा वर्षातील प्रगतीकडे पाहिले तर आपण उन्नतीकडे पाहिजे तितके लक्ष दिले नाही असे वाटते; म्हणावी तितकी प्रगल्भता अजून आली नाही. तुम्हाला सर्व स्वातंत्र्य आहे. पाश्चात्य देशात सर्वांना अजून तरूण आहोत असेच नेहमी वाटते. पण ज्याला काही निश्चित ध्येय आहे, ज्याने आपल्या जन्माला येण्याचा हेतू ओळखला आहे व आपल्या ध्येयसिद्धीसाठी पडेल ते कष्ट करण्याची तयारी आहे तो खरा तरूण. पण सहजयोगीही विचित्र व चुकीचे वागत असल्याचे दिसले की मलाच आश्चर्य वाटते; ते उथळपणाने वागणाऱ्या लोकांकडून कसे भारावले जातात कळत नाही. खरं म्हणजे सहजयोगांत परिपक्व झालेला योगी उगीच इंप्रेस करण्याची भाषा, साखरपेरणी करण्यासाठी वापरतच नसतो पण तुमचा अहंकार दुणावणारा कुणी काहीही बोलला तर तुम्ही प्रभावित होता. प्रत्येकाची व्हायब्रेशन्स तुम्ही तपासली पाहिजेत. त्यासाठी आपल्याला सहजयोगात अजून खूप शिकायचे आहे अशी वृत्ति ठेवा; कधी कधी हे मान्य करण्यात लोकांना कमीपणा वाटतो. मग तुमची प्रगति कशी होणार? तुम्ही जर बोटीमध्ये उतरला आहात तर आधी त्यात नीट, स्वस्थ बसा; पाय बाहेर काढून बसला तर पाण्यातच ओढले जाणार हे समजून घ्या. पण त्याहीपेक्षा मानवी मगरमच्छांपासून तुम्ही स्वतःचा बचाव करण्याबद्दल फार दक्ष राहिले पाहिजे; ते त्यांच्या नकली वागण्या-बोलण्यातून तुम्हाला कधी धोका देतील तुम्हालाच समजणार नाही.

तुम्हाला आता एक प्रकारे तारुण्यात पदार्पण करायचे आहे. नुकत्याच तरूणपणात आलेल्या मुलीमध्ये एक स्वाभाविक लाजरेपणा उमलतो, स्वतःच्या शील-चारित्र्याबद्दल ती जागरूक होते. पण सहजयोगात आल्यावर काही जण तरूणपणात भरकटू लागतात. पण **आपण सहजयोगी आहोत, आपली सहज-संस्कृती आहे, आपण सहजधर्म स्वीकारला आहे आणि आता आपल्यासारखे सर्व लोकांना परिवर्तित करणार आहोत याचे भान तुमच्यामध्ये उतरले पाहिजे.** तीच तुमची जबाबदारी आहे व त्यासाठीच तुमची निवड केली गेली आहे. तुम्हाला मिळालेली सर्वात मोठी शक्ति म्हणजे प्रेमाची शक्ति; हे प्रेम म्हणजे नेहमीचे आंधळे, साधारण प्रेम नव्हे तर ते परमेश्वरी प्रेम.

तुम्ही कसे चालता, वागता, बोलता हे सर्व महत्त्वाचे आहे व ते सर्व 'सहज'मध्ये झाले पाहिजे. आणखी दोन-चार वर्षातच जगभर सगळीकडे आदर्श, परिपक्व शक्तिशाली सहजयोगी मोठ्या प्रमाणावर दिसू लागतील आणि त्यांच्यकडूनच सर्व मानवांची अज्ञान व माया-भ्रमापासून सुटका होण्याचे महान कार्य होणार आहे. तुम्ही सूज्ञता, प्रगल्भता व नम्रता अशी बाणवल्यावर हे अवघड नाही. तो सुवर्ण दिवस मला बघायला मिळेल अशी माझी आशा आहे. सरुवातीला सांगितलेल्या देव-देवतांच्या सभेमध्ये सर्वांनी मला सांगितले होते की ''माणसाच्या अज्ञानामधून झालेले त्याचे सर्व अपराध आम्ही विसरू पण जो कोणी तुझ्या विरोधात जाईल, तुझा अपमान करेल वा तुझा गैरफायदा घेईल, तुझे नियम पाळणार नाही किंवा तुला ओळखणार नाही त्याला आम्ही फार मोठी शिक्ष देऊ.'' म्हणून **माझ्याशी जपून रहा. माझ्या पैशाचा गैरवापर करू नका, माझ्या सभ्यतेचा गैरफायदा घेऊ नका. तुम्ही महामाया व देवदेवतांच्या मध्ये उभे आहात हे पक्के ध्यानात ठेवा. मला तुम्हा सर्वांच्याबद्दल करुणा व सहानुभूति आहे पण त्याबरोबरच सर्व देवगण तुमच्यावर सतत पाळत ठेऊन आहेत;** फोटोग्राफमध्येही हे दिसले आहे म्हणून तुम्ही माझ्यावर भरवसा ठेवा, तुमचे सर्व प्रश्न माझ्यावर सोपवा. कुणीही तुमच्या केसालाही धक्का लावू शकणार नाही; फक्त **स्वतः स्वतःचेच नुकसान करण्याच्या फंदात पडू नका.**

आज तुम्ही प्रत्येकाने मनाशी दृढ निश्चय करा की अध्यात्मिक उन्नति हेच तुमचे ध्येय आहे त्याशिवाय तुम्हाला दुसरे काहीही नको. तुम्ही तुमच्या चक्रांची सतत काळजी घ्या, त्यांना सतत स्वच्छ करा आणि स्वतःबद्दल सतर्क रहा. सर्व काही सुरळीतपणे घडून येईल.

सर्वांना अनंत आशीर्वाद.

●●●

# हंस चक्राबाबत

## प. पू. श्रीमाताजी निर्मलादेवी यांच्या भाषणातील संक्षिप्त अंश

● हंस चक्र जागृत व सतर्क असेल तर आपल्याला काय शुभ आहे व काय नाही हे लगेच समजते. आपल्यामध्ये ईश्वरी विवेक प्राप्त होतो.

● डोळे फार महत्त्वाचे असून ते आत्म्याची खिडकी आहेत असे म्हणतात. तुम्ही पाहिले आहे की कुंडलिनीचे उत्थान झाल्यावर आणि आत्मा प्रकाशित झाल्यावर डोळ्यांच्या बाहुल्यांचा आकार मोठा होतो आणि तुम्ही निरागस मुलासारखे दिसता व तुमच्या डोळ्यात चमक असते.

● हंस चक्र जागृत झाल्यावर आपल्यात विवेक विकसीत होतो. संस्कृतमध्ये एक सुंदर श्लोक आहे. त्यात असे म्हटले आहे की, "हंस आणि बक दोन्ही शुभ्र असतात, तर हंस व बक यांच्यात फरक काय - तर- उत्तर असे की दूध व पाणी एक केल्यास हंस त्यामधील दूध शोषून घेईल परंतु बगळ्यामध्ये तसा विवेक नसतो."

● हंसचक्रावर देवता नाही परंतु बुद्ध, महावीर, खिस्त व श्रीकृष्ण या चार देवता ज्यांची काळजी घेतात. त्या अवयवांची निराकार शक्ति हंस चंक्रावर असते आणि त्याचे व्यवस्थापन श्री गणेश करतात म्हणून हे उपजत गुण श्री गणेशा तेथे घालतात कारण श्री गणेश सूज्ञतेचा स्रोत आहेत.

● अंड्यामधून पक्षी बाहेर आल्यावरही अंड्यामधील अनेक गोष्टी त्याच्या शरीराला चिकटलेल्या असतात. तेव्हा आत्मसाक्षात्कारानंतर प्रथम विवेक तुम्हाला मिळायला हवा त्याशिवाय आत्म्याची विशुद्ध अवस्था कशी मिळणार?

● हंस चक्र सर्वात महान गोष्ट करते. तुम्हाला ज्ञान आहे की नाही मला मला माहित नाही, ती ही की तुमची सर्व कर्म फळे नष्ट होतात. तुम्ही तुमच्या पूर्वजांच्या कर्मकळांच्या साठी जबाबदार रहात नाही. तुम्ही जी काही चुकीची कामे केली असतील ती नष्ट होतात. जणू काही तुमच्या भूतकाळापासून तुम्ही पूर्णपणे अलग होता.

●●●

# सहज-समाचार

## स्पिरिच्युअल इंटेलिजन्स
## (Spiritual Intelligence)

तार्किक किंवा तत्सम कूटप्रश्न उकलण्यासाठी वैचारिक बुद्धिमत्तेची आवश्यकता असते. त्या वैचारिक बुद्धिमत्तेचे मोजमापन करण्यासाठी मनोवैज्ञानिक बऱ्याच काळापासून Intelligence Quotient (IQ) चा वापर करत असत, ज्या व्यक्तीचा वा मुलाचा IQ जास्त ती हुशार गणली जात असे. सुरवाती-सुरवातीला या चाचणीमधे शाब्दिक किंवा गणितसमान क्षमतेचाच अंतर्भाव करण्यात येत असे. नंतरच्या संशोधनानंतर IQ मध्ये हे क्षेत्र संकुचित (मर्यादित) होत असल्याचे आढळून आले. हॉवर्ड गार्डनरने आपल्या Frames of Mind या पुस्तकामधे १९८३ साली IQ ची व्याख्या अधिक व्यापक केली व त्यामध्ये माणसाचे स्वाभाविक बहुगामित्व, सांगीतिक संवेदनक्षमता, आपआपसातले स्नेहसंबंध व त्यामधील व्यावहारिक दृष्टिकोन इ. बद्दलच्या बौद्धिक कुशलतेचा अंतर्भाव आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. त्याची मूळ धारणा अशी होती की माणसाच्या बुद्धीला अनेक पैलू आहेत.

नंतरच्या अनेक मनोवैज्ञानिकांनी केलेल्या अभ्यासातून असे आढळून आले की IQ वरून भावी काळामधील यशस्वितेचा अंदाज येत असला तरी त्यामधे एकंदर जीवनामधील प्रगतीच्या वीस टक्के क्षेत्राचा अणुभाग येतो व बाकीचे क्षेत्र– उदा. सामाजिक परिस्थिती, कौटुंबिक प्राबल्य, नशीब– IQ च्या मोजमापनात दूर राहते.


गेल्या शतकातील शेवटच्या दशकामध्ये डॅनियल गोलमन या शास्त्रज्ञाने Emotional Quotient ची संकल्पना मांडली. त्यामध्ये प्रेम, करुणा, मानसिक सुसंवाद, सुखदुःखांची देवाण-घेवाण, प्रोत्साहनात्मक विचार इ. भावनांचे प्रक्षेपणही विचारात घेतले जाते. त्यातील मूलभूत विचार असा की EQ शिवाय नुसत्या IQ चा एकंदरीत जीवनात खरा फायदा होत नाही; किंबहुना आपल्या व्यावहारिक जीवनात दोन्ही Q लागत असले तरी EQ चे प्राधान्य जास्त फायद्याचे ठरते.

त्याच्याही पुढच्या पायरीवर येऊन दाना जोहर आणि इयान मार्शल यांनी Spiritual Intelligence चा विचार करून SQ ही संकल्पना मांडली आहे; त्यांच्या मते SQ हा IQ व EQ या दोघांचा पाया आहे. त्याला आत्मबुद्धि असे ते म्हणतात. ही संकल्पना थोडक्यात अशी की तार्किक व वैचारिक बुद्धिप्रणाली IQ ठरवतो, पूर्वसंस्कार व सवयीनुसार वागण्यामागच्या भावनेचा विचार EQ ठरवतो तर सर्जनशील व अंतर्दृष्टिमधून येणारे आपल्या भूमिकेमध्ये समग्र परिवर्तन घडवणारे विचार SQ ठरवतो. शास्त्रीय भाषेत बोलायचे झाले तर IQ चा संबंध मज्जारज्जूशी व EQ चा संबंध मज्जतंतूच्या जाळ्याशी असतो. नादसंगीतामधून वेगवेगळ्या मज्जातंतूमधून उत्पन्न होणाऱ्या स्पंदनांमध्ये SQ चा भाग दिसून येतो. असेही म्हणता येईल की एखादी वस्तू त्याच्या तुकड्यांच्या बेरजेपेक्षा मोठी असू शकते त्याप्रमाणे SQ मुळे आपल्याला वस्तूचे सखोल, समग्र व भौतिक आकलन होते.

आपला SQ ओळखणे व जाणीवपूर्वक वृद्धिंगत करून EQ व IQ चा प्रभावी उपयोग करणे शक्य आहे. भारतीय योगशास्त्रामध्ये मानसिक संवेदना, बुद्धीमधून निश्चयात्मक आकलन आणि आत्म्याचा प्रकाश या मूलभूत ज्ञानाचा संकल्पना सांगितल्या जातात व त्या सर्वांचा आधार ध्यान आहे. ध्यानामधून बुद्धीमध्ये प्रकाश येऊन तो उन्नत होत असते आणि सरतेशेवटी आत्मसाक्षात्कार मिळतो. सहजयोग ध्यानप्रणालीमध्ये मानवाच्या सूक्ष्म शरीरातील तीन नाड्या व सात चक्रांच्या संस्थेमधून कुण्डलिनीच्या जागरणानंतर ती सातव्या चक्रातून पार झाल्यावर त्या सुप्त शक्तीच्या थंड चैतन्य लहरींची अनुभूति मिळते. त्यातून माणसाला एक नवीन जाणीव मिळते व त्याद्वारा स्वतःच्या व इतरांच्या चक्रांची स्थिती समजते. ही संवेदनात्मक जाणीव म्हणजे SQ. हा SQ वाढला की EQ वाढून भावनिक गुण समृद्ध होतात - उदा. पहिल्या चक्रातून निरागसता, दुसऱ्या चक्रातून सर्जनशीलता, तिसऱ्यामधून समाधान इ. परिणामस्वरूप व्यक्तीमध्ये आमूलाग्र परिवर्तन होते.

संदर्भ : Times of India २४ जानेवारी २००१

# वाढदिवस समारंभ दिल्ली मार्च २००१ काही क्षणचित्रे










## विश्व निर्मल विद्यामंदिर : जेजुरी

जेजुरी इथे श्री. पॅट्रिक रेडिकन या सहजयोगीबंधूने सुरू केलेल्या विश्वनिर्मल विद्यामंदिर या इंग्रजी माध्यम-माध्यमिक शाळेच्या नवीन इमारतीचा पायाभरणी समारंभ ६ एप्रिल २००१ रोजी संपन्न झाला. हा समारंभ महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री श्री. दादासाहेब जाधवराव यांच्या शुभहस्ते पार पडला. महाराष्ट्र राज्यशासनामधील आय. टी. विभागाचे डायरेक्टर श्री. विजयकुमार गौतम प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. स्थानिक प्रशासनातील अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

चैतन्य-लहरी, पुणे व पुणे सहजयोग केंद्रातर्फे जेजुरीमधील विद्यामंदिरास व संस्थेमधील पदाधिकाऱ्यास शुभेच्छा.

★

## पोलिस मुख्यालय, पुणे

पुण्यातील पोलिस-आयुक्त कार्यालयामध्ये प्रशिक्षणासाठी येणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी सहजयोग कार्यक्रम सुरू केल्याचे चैतन्य-लहरी अंक नोव्हें-डिसें. २००० मध्ये प्रसिद्ध झाले आहेच. हे कार्यक्रम अजूनही सुरु आहेत. आतापर्यंत प्रत्येकी ५०-६० कर्मचाऱ्यांची बॅच अशा दहा बॅचेसचे कार्यक्रम घेण्यात आले. प्रत्येक कार्यक्रम तीन दिवसांचा असतो व प्रतिसाद चांगला आहे.

**असे कार्यक्रम करण्याची परवानगी सहाय्यक पोलिस-आयुक्त श्री. बी. एम. वाडिले यांच्या दि. ३०.११.२००० च्या पत्रान्वये मिळाली होती. ही प्रत मागे दिली आहे.** या संदर्भावरून बाहेरगावच्या सहजयोग केंद्रांनी आपआपल्या क्षेत्रामध्ये असेच कार्यक्रम आयोजित करण्याचे प्रयत्न करावे.

★

प त्र.
:-=-=-=-:

जा. क्र./सपोआ/सहजयोगा/४०५६ /२०००
सहाय्यक पोलीस आयुक्त, कल्याण व
मुख्यालय, पुणे यांचे कार्यालय,
दिनांक : ३० /११/२०००

प्रति,
श्री. के. के. ठाकूर,
ॲडव्होकेट,
फ्लॅट नं. १ गणेश चेंबर्स,
उर्मिला हाऊसिंग सोसायटी, धनकवडी,
पुणे - ४३, फोन नं. ४३७ ६२ २१.

विषय :- पोलीस मुख्यालय येथे नियमितपणे आयोजित करण्यात येणा-या उजळणी कोर्समधील पोलीस कर्मचा-यांसाठी " सहजयोगा " चे शिबीर घेण्यास परवानगीबाबत.

संदर्भ :- आपले दिनांक ०९/११/२००० रोजीचे पत्र.

=====

उपरोक्त विषय व संदर्भान्वये आपणांस कळविण्यात येते की, पोलीस मुख्यालय शिवाजीनगर पुणे येथे नियमितपणे आयोजित करण्यात येणा-या उजळणी कोर्सचे कर्मचारी अधिकारींना १५ दिवसांत एकूण तीन व्याख्याने प्रत्येकी एक तासाप्रमाणे घेऊन आपण मार्गदर्शन करणेकरिता आपणास परवानगी देण्यात येत आहे.

सदरची व्याख्याने ही विनामुल्य घेण्यात येतील या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

आपण सदरबाबत सहाय्यक पोलीस आयुक्त, कल्याण व मुख्यालय, पुणे यांचेशी चर्चा करून वार व वेळ ठरवून कार्यवाही करावी.

[ डी. एम. वाडिले ]
सहाय्यक पोलीस आयुक्त,
कल्याण व मुख्यालय, पुणे.
२९/११/२०००

मा. अपर पोलीस आयुक्त सो
पुणे शहर यांचे मान्यतेने.

होळी उत्सव प्रतिष्ठान, पुणे. ९ मार्च २००१









## वाढदिवस समारंभ दिल्ली, १९-२०-२१ मार्च २००१



